नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




महासागर कडून सर्व बच्चे कंपनीला तान्हा पोळ्याच्या शुभेच्छा..!


* वर्ष ५१ * अंक ५२ * * अमरावती * शनिवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


अग्राग्रलेख

## खरीखरी..

## नक्षल, राष्ट्रध्वज आणि तरुण

१५ ऑगस्ट या आपल्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याच्या पर्वावर छत्तीसगडमधील कांकेर येथे बस्तर सारख्या ठिकाणी एका स्वाभिमानी तरुणाने देशभक्तीचा परिचय देऊन नक्षलवाद्यांच्या भीतीनंतरही राष्ट्रध्वज फडकवला. आपल्या देशातील नक्षलवादी चळवळ जवळजवळ संपलेली आहे असे सरकारने जाहीर केलेले आहे. परंतु अजूनही नक्षलवाद्यांचे काही अड्डे कायम आहेत. अशा भागात या देशभक्त तरुणाने राष्ट्रध्वज फडकावला. ही राष्ट्राभिमानी कृती केल्यामुळे त्याच्या या घोर अपराधाबद्दल तेथील काही नक्षलवाद्यांनी त्याच गावात जन अदालत भरवली, भर दिवसा भरवलेल्या जन अदालतीमध्ये या देशभक्त तरुणाला पोलिसांचा मुखबीर म्हणजेच टीप देणारा असे जाहीर केले. त्या ठिकाणी आरोप करणारे नक्षलवादी होते, न्याय देणारेही नक्षलवादीच होते. त्यामुळेच त्याची कोणतीही गोष्ट न ऐकता त्याला मृत्यू दंडाची शिक्षा फर्मावण्यात आली आणि थोड्याच वेळात या तरुणाला भर गावासमोर गळा आवळून त्याची जीवनलीला संपवण्यात आली. तो तरुण आपल्या देशाच्या ध्वजासाठी आणि भारत मातेसाठी शहीद झाला. इतके झाल्यावर सुद्धा त्याच्या कुटुंबीयांनी पोलिसात तक्रार करण्याची हिम्मत केली नाही. मग या ठिकाणी नक्षलवाद्यांचा दरारा किती असेल याची कल्पनाच केलेली बरी. देशाच्या स्वातंत्र्यदिनी घडलेली ही घटना त्यानंतर दोन दिवसांनी पोलिसांना कळली. मात्र असे क्रुर कृत्य करणाऱ्या लोकांचा छडा अद्यापी पोलिसांनाही लागलेला नाही. ही नक्षलवादी चळवळ ज्या लोकांनी स्थापन केली, त्यामध्ये मुख्य तीन लोक होते. कनू संन्याल, चारू मुजुमदार आणि जंगली संथाल या तिघांनी या चळवळीची स्थापना केली. स्थापना केलेल्या मधील जंगली संथाल आणि चारू मुजुमदार नंतर मरण पावले तर कनू संन्याल यांनी आत्महत्या केली. मुळात ज्या उद्देशाकरिता ही चळवळ उभी केली होती तो उद्देश सफल न होता त्याला वेगळेच वळण लागल्याने हे तीनही संस्थापक दुःखी होते. विशेष म्हणजे क्रांतीची बीजे रोवण्यासाठी ज्या तिघांनी शस्त्रे हाती घेतली ते तिघेही कफल्लक होते. त्यानंतर मात्र नक्षलवादाच्या नावाखाली ज्या गुन्हेगारी टोळ्या जन्माला आल्या. ते खंडणीखोर नंतर चमडीचोर आणि भोगवादी झाले. त्यांच्या मतानुसार ते सांगतील किंवा ठरवतील तो न्याय, ज्याला दोषी ठरवले तो पोलिसांचा मुखबीर म्हणजेच खबरी पुरवणारा आहे आणि अशा पोलिसांच्या हेरांना यातना देऊन मारणे हीच यांची क्रांती अशा गोष्टी पुढे आल्या. आपल्या सरकारने अनेक क्षेत्रांमधील नक्षलवाद्यांना एक तर संपवले आहे किंवा ते शरण आले आहेत. एवढी प्रचंड कसरत झाल्यावरही नक्षलवाद्यांची काही बेटे आजही शिल्लक आहेत, हेच यातून निष्पन्न होत आहे. नक्षलवादाचा हा रोग ज्या ज्या भागांमध्ये आहे त्या भागात त्यांची अजूनही दहशत आहे. मध्यंतरी त्यांच्या म्होरक्यांनी शांततेची भाषा केली होती. सरकार ती मान्य करणे शक्यच नव्हते कारण यांना ठेचायचेच हा सरकारचा बाणा होता. मात्र अजूनही १००% नक्षलवादी संपलेले नाहीत कारण ज्या ठिकाणी ते शिल्लक आहेत त्या ठिकाणी अजूनही सुडाच्या नावाखाली दहशत पसरवून खंडणी खोरीचा प्रवास सुरू आहे. परवाच्या घटनेत जे क्रौर्य दिसले त्या ठिकाणी माणुसकी संपली होती, माणसे संपली होती आणि त्यांचे श्वापदात रूपांतर झाले होते. या श्वापदांनी ज्या ध्येयवादी राष्ट्रभक्त तरुणाचा जीव घेतला त्याला शहिदाचा दर्जा देऊन त्याच्या कुटुंबीयांना सरकारने दिलासा दिला पाहिजे. राष्ट्रभक्तीसाठी हौतात्म्य पत्करलेल्या तरुणासाठी आमची दुःखी मनाने श्रद्धांजली!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टपूर्तीत

# महिलांचा सहभाग वाढावा

### मुख्यमंत्री फडणवीस यांची अपेक्षा : दोन दिवसीय शक्ती संवाद कार्यक्रमाचे आयोजन





**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. शक्ती संवादाच्या माध्यमातून महिला सुरक्षा आणि सक्षमीकरणाबाबत चर्चा आणि विचार मंथन होत असून, यावर सकारात्मक विचार करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय शक्ती संवाद कार्यक्रमाचे हॉटेल ट्रायडंट येथे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

या कार्यक्रमास विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, मंत्री आदिती तटकरे, बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, डॉ.पंकज भोयर, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, रूपाली चाकणकर, आमदार चित्रा वाघ, मनीषा चौधरी, विद्या ठाकूर, सदस्य सचिव नंदिनी आव्हाडे, सहसचिव राधिका चक्रवर्ती यांच्यासह विविध राज्यातील महिला आयोगाच्या अध्यक्षा, सहसचिव, सदस्य उपस्थित होते. यावेळी पॉश कायद्यासंदर्भातील पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

फडणवीस म्हणाले की, महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. दोन दिवस शक्ती संवादाच्या माध्यमातून राज्यासह देशातील महिलांच्या विविध समस्या आणि त्यावर उपाय यासदंर्भात चिंतन मंथन होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नपूतीर्साठी महिलांचा सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत सहभाग आवश्यक आहे.

विकसित अर्थव्यवस्थेसाठी लैंगिक समानता महत्त्वाची आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून जातीभेद आणि लिंगभेद समाप्त करून व्यक्तीच्या रूपाने सर्वांना समान संधी आणि अधिकार प्राप्त करून दिले आहेत. महिलांचे शिक्षण, रोजगार हे केवळ अधिकार राहिले नसून आर्थिक परिवर्तनासाठी आवश्यक आहेत.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या की, देशभरात विविध राज्यातील महिला आयोग महिलांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे. सर्व राज्यांनी एकत्रितरित्या काम केल्यास अधिक चांगले परिणाम साधता येतील. महाराष्ट्रात उद्योग जास्त असल्याने प्रत्येक कार्यालयात पॉश ॲक्ट संदर्भात समिती कार्यरत असणे गरजेचे असून त्यासाठी प्रयत्न करणार आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, भारतीय राज्यघटनेने महिलांच्या सन्मान व हक्कांच्या रक्षणासाठी केलेल्या विशेष तरतुदीनुसार राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महिलांची सामाजिक स्थिती उंचावणे, हक्कांचे रक्षण करणे व अन्यायाविरुद्ध न्याय मिळवून देणे हा याचा उद्देश आहे.

रूपाली चाकणकर म्हणाल्या की, राज्यातील महिला तस्करी संपूर्ण नष्ट करण्याच्या दृष्टीने राज्य महिला आयोग काम करीत आहे. याप्रसंगी इतर मान्यवरांनीही आपापले विचार मांडले . कार्यक्रमाला भरगच्च उपस्थिती होती.

### गडचिरोली, नागपूर व भंडारा जिल्ह्यांमध्ये विकास प्रकल्प

आदिवासी समुदायाचे जीवनमान उंचावणे, त्यांच्या जीवनात शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी सार्वजनिक आणि सामाजिक क्षेत्राचा सहभाग आवश्यक आहे. कृषी आधारित वैविध्यपूर्ण योजना राबवल्या जात असून त्यांच्या शाश्वत विकासासाठी मॉयल लिमिटेडचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन फडणवीस यांनी केले.

ते म्हणाले, नीती आयोगाने देशातील निवडक आकांक्षी जिल्ह्यांमध्ये गडचिरोलीचा समावेश केला आहे. स्वयंसेवी संस्थाचा सहभाग व 'मॉयल लिमिटेडच्या योगदानातून विविध जिल्ह्यातील आदिवासी समुदायासाठी शाश्वत परिणामकारक उपाययोजना राबविण्यात येतील. 'मॉयल लिमिटेडह्ने आदिवासी क्षेत्रातील सामाजिक कामासाठी बीआयएसएलडी या स्वयंसेवी संस्थेची निवड करत निधी उपलब्ध करून दिला आहे. ही संस्था राबवत असलेल्या उपक्रमांतून गडचिरोली जिल्ह्यातील १८ हजार कुटुंबांना आधार देण्यासाठी उपजीविकेशी संबंधित विविध उपक्रम राबवले जात आहेत.

### सुटीची सूचना

**तान्हा पोळानिमित्त शनिवार दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी महासागर कार्यालयास सुटी असल्याने रविवार दि. २४ ऑगस्ट २०२५ चा अंक प्रकाशित होणार नाही. सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

**■ व्यवस्थापक**

## राधाकृष्णन वेगळ्या विचारांचे, पाठिंबा नाही

### शरद पवारांनी स्पष्टच सांगितले



**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मला फोन कॉल आला होता. उपराष्ट्रपतिपदासाठी त्यांच्या पक्षाचे जे उमेदवार आहेत, ते महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. त्यामुळे त्यांना पाठिंबा देण्याची विनंती त्यांनी माझ्याकडे केली.

मात्र राधाकृष्णन राज्यपाल असताना झारखंडच्या सीएम यांना त्यांच्या राजभवनात अटक झाली होती. त्यामुळे त्यांना पाठिंबा देणे आमच्यासाठी शक्य नसल्याचे मी त्यांना सांगितले आहे. अशी माहिती शरद पवार यांनी दिली आहे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आज पडली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

शरद पवार यांनी सांगितले की, आमच्याकडे मतदार कमी आहेत, हे आम्हाला माहिती आहे. मात्र, आम्हाला निकालाची चिंता नाही. उपराष्ट्रपती निवडणुकीत आमच्याकडे लोकसभा आणि राज्यसभा मिळून मतदार ठरलेले आहेत. आमचा उमेदवार विजयी होईल, एवढी संख्या आमच्याकडे नाही. आमची ठरलेली मते आहेत. त्यामुळे बाकीचे उद्योग आम्ही करत बसणार नाही. मते कमी असली तरी आम्ही निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

आमचे मतदार किती आहेत, हे आम्हाला माहिती आहे. त्यामुळे या निवडणुकीत काही वेगळा निकाल लागेल, अशी अपेक्षाच नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

**राहुल गांधींना चांगला प्रतिसाद**
बिहारमध्ये राहुल गांधी यांचा दौरा चालू आहे. त्या ठिकाणाहून मिळत असलेल्या फीडबॅक नुसार त्यांच्या दौऱ्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. बिहार हे राज्य आर्थिक दृष्ट्या अडचणीचे राज्य आहे. हे आपण नेहमी ऐकतो.

असे असले तरी राजकीय दृष्ट्या बिहार हे अत्यंत जागृत राज्य असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. बिहारमध्ये मत चोरी संदर्भात या यात्रेच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आम्ही आगामी काळात हा कार्यक्रम देशभरात राबवला जाईल, अशी माहिती देखील शरद पवार यांनी दिली.

**३०० खासदार हे रस्त्यावर उतरले होते**
मतदार यादी बाबत आमचा अभ्यास सुरू आहे. मात्र निवडणूक आयोग स्पष्ट माहिती द्यायला तयार नाही, असा आरोप देखील शरद पवार यांनी केला आहे.

यासंदर्भात पहिल्यांदाच ३०० खासदार हे रस्त्यावर उतरले होते. त्या ठिकाणी आम्हाला अटक देखील झाली होती, अशी माहिती देखील शरद पवार यांना दिली आहे.

### औषध कंपनीत नायट्रोजन वायूची गळती

## ४ कामगारांचा गुदमरून मृत्यू

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
पालघर जिल्ह्यातील मेडले फॉर्मास्युटिकल्स लिमिटेड कंपनीत नायट्रोजन वायूची गळती झाली. या अपघातात गुदमरून चार कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर दोघांची प्रकृती गंभीर आहे.

जखमींना जवळच्या शिंदे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बोईसर तारापूर एमआयडीसी परिसरात असलेल्या कंपनीच्या प्लँट क्रमांक एफ-१३ मध्ये औषध निर्मिती प्रक्रिये दरम्यान नायट्रोजन वायूची गळती झाली असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

पालघर जिल्ह्यातील बोईसर तारापूर एमआयडीसी परिसरातील मेडले (मेडली) फॉर्मास्युटिकल्स लिमिटेड कंपनीत प्लँट क्रमांक एफ-१३ मध्ये औषध निर्मिती प्रक्रिये दरम्यान सहा कामगारांना नायट्रोजन वायू गळतीचा त्रास झाला. या अपघातात गुदमरून चार कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर दोघांची प्रकृती गंभीर आहे.

फार्मा कंपनीत अल्बेंडाझोल औषध तयार केले जात होते. या दरम्यान नायट्रोजन वायू मिसळताना अचानक गळती झाली. वायूच्या संपर्कात आल्यानंतर कामगार बेशुद्ध पडले. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृतांमध्ये कमलेश यादव, कल्पेश राऊत, धीरज पवार आणि बंगाली ठाकूर यांचा समावेश आहे. त्याच वेळी रोहन शिंदे आणि नीलेश आदळे यांची प्रकृती गंभीर आहे.

घटनेची माहिती मिळताच बोईसरचे उपविभागीय पोलिस अधिकारी विकास नाईक त्यांच्या पथकासह घटनास्थळी पोहोचले आणि तपास सुरू केला. अपघातानंतर कंपनी परिसरात गोंधळाचे वातावरण आहे.

अपघातानंतर फार्मा कंपनीत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी काम करणारे कामगार कंपनी सोडून पळू लागले. कंपनीतून बाहेर पडलेल्या लोकांनी सांगितले की नायट्रोजन गॅसची अचानक गळती झाली. चार कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला. गॅस पसरण्यापूर्वीच आम्ही बाहेर पडलो. तथापि, कंपनीच्या अग्निशमन दलाने वेळीच गॅस गळती आटोक्यात आणली, त्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे.

### आरएसएस बंदी घातलेली संघटना आहे का?

**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**
आरएसएस बंदी घातलेली संघटना आहे का? संघाने नेहमीच राष्ट्रवाद शिकवला. त्यामुळे कुणीही संघाच्या एखाद्या कार्यक्रमात गेले, तर त्यावर एवढा आकांडतांडव करण्याची गरज नाही, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पत्नी आणि खासदार सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला लावलेल्या हजेरी समर्थन केले.

## पावसापासून दिलासा मिळणार का?

**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**
गेल्या चार दिवसांपासून महाराष्ट्रात झालेल्या मुसळधार पावसानंतर आता हवामान विभागाने दिलासादायक अंदाज व्यक्त केला आहे.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा उत्तरेकडे सरकला आहे आणि अरबी समुद्रात तयार झालेले चक्रीवादळ गुजरातकडे वळत आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत महाराष्ट्रात पावसाची तीव्रता कमी होण्याची शक्यता आहे. गेल्या चार दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबई, पुणे, मराठवाडा आणि विदर्भात कहर दिसून आला आहे.

## १११ किलो गांजासह ३७ लाखाचा मुद्देमाल जप्त



**■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २२ :**
चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीतील पळसखेड फाट्यासमोर चांदूर रेल्वे पोलिसांनी १११ किलो गांजा जप्त केला. ही कारवाई शुक्रवार २२ ऑगस्ट रोजी दुपारी करण्यात आली.

दोन इसम हे गांजा घेवून चारचाकी वाहनाने नांदगाव खंडेश्वर रोडने जाणार असल्याची माहिती चांदूर रेल्वे पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, सापळा रचण्यात आला. राजपत्रीत अधिकारी नायब तहसिलदार, दोन शासकीय पंच, फोटोग्राफर, वजन मापारी वजन काट्यासह व पोलीस स्टॉपसह नांदगाव खंडेश्वर रोडने गेले असता ग्राम पळसखेड फाट्यासमोर एक चारचाकी बोलेरो गाडी येतांना दिसली. वाहनात चालक यश भास्करराव लाहे (वय २१), रा. पिंपळगाव बैनाई, ता. नांदगाव खंडेश्वर व फिरोज सैय्यद अनवर (वय ३६), रा. सांताक्रुझ, इस्ट मुंबई, हे दोघे आढळून आले. बोलेरो गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये १११ किलो ६०० ग्रॅम गांजा आढळून आला, ज्याची किंमत २५ लाख ६६ हजार ८०० रूपये आहे. १० लाख ५० हजार रुपये किमतीचे वाहन, १ लाख रुपयाचा ॲपल मोबाईल, अन्य मोबाईल, एक टॅब, रोख ६६०० रुपये असा एकूण ३७ लाख ४२४०० रूपयांचा माल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीस पोलीस अधिकारी अनिल पवार, पोलीस निरीक्षक अजय आकरे यांचे मार्गदर्शनामध्ये सहाय्यक ठाणेदार शरद आहेर, पीएसआय रोहीत कुदळे, पीएसआय नंदलाल लिंगोट, पोलीस अंमलदार शिवाजी घुगे, प्रविण मेश्राम, राहुल इंगळे, निलेश रिठे, प्रशांत ढोके, संदीप वासनिक, संदीप बटुकले, ऋषीकेश जगदाळे, महीला पोलीस अंमलदार किर्ती सयाम, चालक प्रकाश बिरोले, चंद्रकांत गाडे यांनी केली.

### वरिष्ठ लिपिकाची निर्घृण हत्या

**■ महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. २२ :**
पोळा सणाच्या दिवशी शुक्रवारी सकाळी बडनेरा येथील जुनी वस्ती पवार वाडी परिसरात एका ५० वर्षीय वरिष्ठ लिपिकाची निर्घृण हत्या करण्यात आली. अतुल ज्ञानदेव पुरी असे मृताचे नाव आहे.

ते अमरावती शहरातील पुंडलिक बाबा नगर येथील रहिवासी होते. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीन संचालित नांदुरा रेल्वे येथील पुंडलिक महाराज महाविद्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत होते.

अतुल पुरी रेल्वे स्थानकावर पोहचत असताना सकाळी नऊ वाजता अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. त्यांचा जागीच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या हत्येचे कारण अद्याप समजले नाही.

## योग्य वेळी शेतकऱ्यांची कर्ज माफी करणार!



अजित पवारांची ग्वाही

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
राज्य सरकारच्या वतीने वेगवेगळ्या पद्धतीने शेतकऱ्यांना मदत करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

अहिल्या नगर जिल्ह्यामधील नेवासा तालुक्यातील शेतकरी बाबासाहेब सरोदे या शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार बोलत होते. योग्य वेळी शेतकऱ्यांची कर्ज माफी करू, असे आश्वासन देखील अजित पवार यांनी दिले आहे.

अजित पवार म्हणाले की, वीस हजार कोटींचा भार वीज बिल माफ करून बळीराजाला मदत करण्याच्या दृष्टिकोनातून निर्णय घेतला आहे. तर ४५ हजार कोटींचा भार लाडक्या बहिणीच्या निमित्ताने उचललेला आहे. वेगवेगळ्या पद्धतीने बळीराजाला मदत करण्याचे काम शासनाच्या वतीने केले जात आहे.






संकलन : गुल्लू उर्फ देविकिसन भन्साली, प्रतिनिधि सिंदी (रल्वे. )

# कॉर्पोरेट कंपन्यांनी मागास जिल्ह्यांमध्ये काम करावे : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

कॉर्पोरेट व खासगी संस्थांनी आपले सामाजिक उत्तरदायित्वाचे काम करताना शहरी भागावर लक्ष केंद्रीत न करता दुर्गम आणि विकासाच्या दृष्टीने मागास जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक व सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम राबविण्यावर भर द्यावा. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तनाच्या नव्या टप्प्यात सर्वांनी एकत्र येत व्यापक आणि परिणामकारक परिवर्तन घडवून आणूयात, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनच्या पाचव्या व्यवस्थापकीय संचालक मंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी सिद्धिविनायक देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर, मुख्य सचिव राजेश कुमार, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, व्हीएसटीएफचे व्यवस्थापकीय संचालक प्रवीणसिंह परदेशी, टाटा ग्रुपचे अध्यक्ष नोवेल टाटा, जेएसडब्ल्यू ग्रुपच्या संगीता जिंदाल, आयडीबीआयचे व्यवस्थापकीय संचालक राकेश शर्मा, जीआयसी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रामास्वामी नारायणन, यांच्यासह गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एसटीएल लिमिटेडने तयार केलेल्या जलसंधारण कामाच्या अहवालाचे प्रकाशन तसेच लातूर येथील रावसाहेब पाटील शेतकरी उत्पादक कंपनीच्या वेअर हाऊसचे ई अनावरण करण्यात आले. दर्जा व्यवस्थापनासंदर्भात क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडिया आणि व्हिएसटीएफ यांच्यात तसेच हरित छत्रपती संभाजी नगर उपक्रम राबविण्या संदर्भात एसटीएल, व्हिएसटीएफ व छत्रपती संभाजी नगर महापालिका, सामाजिक वनीकरण विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, व्हीएसटीएफच्या पहिल्या टप्प्यात अनेक गावांमध्ये राबविलेल्या योजनांचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून त्याच्या मूल्यमापनाचे परिणाम उत्साहवर्धक आहे. या टप्प्यात काही त्रुटी राहिल्या असल्या तरी त्या सुधारून दुसऱ्या टप्पा अधिक प्रभावीपणे राबवून तो यशस्वी करू. ग्राम परिवर्तन उपक्रमाची अंमलबजावणी करताना व्हीएसटीएफचे फेलोज गावातून बाहेर पडल्यावर तेथील परिवर्तनाचा वेग मंदावल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या पुढील काळात गावातच उपलब्ध मनुष्यबळावर आधारित संस्थात्मक संरचना उभी करणे गरजेचे आहे. गावांमध्ये योजनांची अंमलबजावणी करताना प्रत्येक गावाची गरज ओळखून योजनांमध्ये बदल केल्यास परिवर्तनाची गती वाढेल.

व्हीएसटीएफ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात अनेक खासगी कंपन्यांनी व सामाजिक उत्तरदायित्व क्षेत्रातील भागीदारांनी केवळ आर्थिक सहाय्यच नव्हे तर धोरणात्मक बदल, नवी तंत्रज्ञान, डेटा आधारित प्रक्रिया आणि नाविन्यपूर्ण उपाय सुचवून शासनाच्या प्रयत्नांना बळकटी दिली. हे परिवर्तन केवळ योजना राबवणे नव्हे, तर गावात समर्पित व्यक्तींची उपस्थिती, सामाजिक बांधिलकीने काम करणारे फेलोज आणि स्थानिक पातळीवर संस्था उभ्या करण्यावर लक्ष केंद्रीत होते, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

प्रत्येक खासगी भागीदारांचे योगदान अत्यंत मोलाचे असून, सरकारी योजनांची सखोल माहिती व सहयोगाने गावोगावी उत्तम परिणाम साधता आला आहे. व्हीएसटीएफ आणि भागीदार असलेल्या खासगी कंपन्यांमुळे ग्राम विकास परिवर्तनात चांगले काम झाले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या लखपती दीदी योजनेचा राज्यात मोठ्या प्रमाणावर लाभ झाला असून, केवळ दोन वर्षांत महाराष्ट्रात ५० लाख महिला लखपती दीदी बनल्या आहेत. शासनाकडून त्यांना केवळ संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या असून त्याचे खरे श्रेय त्या महिलांचेच आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.


यावेळी टाटा ग्रुपचे अध्यक्ष नोवेल टाटा म्हणाले की, महाराष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी टाटा ग्रुप व टाटा ट्रस्ट नेहमीच राज्य शासनाला सहकार्य करेल.

## पक्षाने जबाबदारी देताच नवाब मलिक ॲक्टिव्ह



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या आधी व्यवस्थापन समिती स्थापन करून त्याची धुरा माजी मंत्री नवाब मलिक यांच्यावर सोपवली आहे. पक्षाच्या वतीने देण्यात आलेल्या जबाबदारी नंतर मलिक देखील ॲक्टिव्ह झाले आहेत. त्यांनी या संदर्भात बैठक घेत पक्ष मजबूत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था महायुती एकत्र लढणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे आता नवाब मलिक महायुतीमधील इतर पक्षाशी कशा पद्धतीने समन्वय साधतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे आगामी काळात होणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुका संदर्भात सर्वच पक्ष आपापल्या पद्धतीने तयारीला लागले आहेत. मात्र निवडणुकीच्या तोंडावर समीर भुजबळ यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुंबई अध्यक्ष पदावर राजीनामा दिला होता. या समितीमध्ये माजी मंत्री नवाब मलिक यांच्यासह शिवाजीराव नलावडे, सिद्धार्थ कांबळे, आमदार सना मलिक, झिशान सिद्दिकी, संतोष धुवाळी, भास्कर विचारे, संजय तटकरे, राजू घुगे, महेंद्र पानसरे, सुरेश भालेराव यांचा समावेश आहे.

## ठाकरे बंधू एकत्र आले तरी फरक पडणार नाही
### संजय निरुपम यांचा दावा



**मुंबई :** सत्तेसाठी बाळासाहेबांचे विचार सोडणारे आणि वारंवार भूमिका बदलणारे ठाकरे बंधू एकत्र आले तरी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत फारसा फरक पडणार नाही हे बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीतून दिसून आले, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे उपनेते तथा प्रवक्ते संजय निरुपम यांनी शुक्रवारी केली. मुंबईतील बेस्ट पतपेढीची नुकतीच निवडणूक झाली. त्यात ठाकरे बंधूंच्या पॅनलचा दारूण पराभव झाला. संजय निरुपम यांनी शुक्रवारी या प्रकरणी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत ठाकरे बंधूंवर निशाणा साधला. तसेच त्यांच्या आघाडीमुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत काहीही फरक पडणार नसल्याचा दावा केला. ठाकरे बंधु एकत्र आल्याने मुंबईचे राजकारण बदलेल असे केले जाणारे दावे या निकालाने फोल ठरले, असा टोला निरुपम यांनी यावेळी लगावला. मराठी माणसांच्या मनात बाळासाहेब ठाकरेंनंतर आता एकनाथ शिंदे यांना स्थान आहे, असे ते म्हणाले. निरुपम पुढे म्हणाले की, बेस्ट पतपेढी निवडणुकीपूर्वी मुंबईत उबाठा आणि मनसेची युती करण्यात आली होती. मराठी मतांसाठी त्यांनी मराठी विरुद्ध हिंदी असा वाद निर्माण केला.

## उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत क्रॉस व्होटिंग होण्याची शक्यता
### संजय राऊत यांचा दावा



**मुंबई :** उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत क्रॉस व्होटिंग होण्याची शक्यता असल्याचा खळबळजनक दावा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या निवडणुकीत एनडीएचे उमेदवार हे महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. त्यामुळे सी.पी. राधाकृष्णन यांना मतदान करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना फोन केला होता. याबाबत प्रश्न विचारला असता संजय राऊत यांनी भाजपवर टीका केली आहे. या निवडणुकीत क्रॉस व्होटिंग होण्याची भीती असल्यामुळेच मते मागण्यासाठी फडणवीस फोन करत असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला. उपराष्ट्रपती पदाबाबत इंडिया आघाडीच्या बैठकीतच मी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची भूमिका स्पष्ट केली होती. फडणवीस यांचा फोन आला असला तरी आम्ही ती केवळ त्यांची औपचारिकता असल्याचे मानतो, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. मात्र, दोन्ही उमेदवार दक्षिणेकडील असल्यामुळे भाजपला क्रॉस व्होटिंगची भीती आहे. त्यामुळे मते मागण्यासाठी केंद्रीय नेत्यांशी राजनाथ सिंह आणि राज्यात देवेंद्र फडणवीस फोन करत असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

## जड वाहन धारकांसाठी मोठा दिलासा

**मुंबई :** राज्यातील जड मालवाहतूक वाहनधारकांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक वर्षांपासून चालकाबरोबर सहाय्यक (क्लिनर) अनिवार्य ठेवण्याच्या अटीविरोधात वाहनधारक संघटनांनी आंदोलन छेडले होते. अखेर त्यांच्या मागण्यांवर सरकारने पावले उचलली असून या संदर्भात धडाकेबाज मसुदा अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. वाहन निर्मितीत झपाट्याने होणाऱ्या तांत्रिक बदलांचा दाखला देत, वाहनधारकांनी क्लिनर ठेवण्याची सक्ती ही फक्त आर्थिक बोजा वाढवते, असे स्पष्ट केले होते. शासनाने हा मुद्दा गांभीयार्ने घेत आता ड्रायव्हर असिस्ट सिस्टीम असलेल्या वाहनांसाठी क्लिनरची सक्ती रद्द करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. म्हणजेच, 360 अंश कॅमेरे, ब्लाइंड स्पॉट लाईव्ह फीड, प्रॉक्सिमिटी अलार्म यांसारख्या अत्याधुनिक यंत्रणांनी सज्ज वाहनांना स्वतंत्र क्लिनर लागणार नाही. याबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी माहिती देताना सांगितले की, 1988 च्या मोटार वाहन कायद्यानुसार शासनाने सुधारणा प्रस्तावित केली असून, 29 ऑगस्टपर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्या आधारे अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

## राज्य महोत्सव गणेशोत्सवाकरिता प्रत्येक शासकीय विभागाने सहभागीता वाढवावी : ॲड. आशिष शेलार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

गणेशोत्सव हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. गणेशोत्सवाला राज्य महोत्सव घोषित केले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती गणेशोत्सवात सहभागी असते. आता गणेशोत्सव प्रथमच राज्य शासन साजरा करत असल्याने हा उत्सव आता अधिक व्यापक प्रमाणात साजरा करून त्यात लोकसहभाग वाढवावा. यासाठी प्रत्येक विभागांनी विविध उपक्रमातून आपली सहभागीता वाढवून आपापल्या समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करावी, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी उपस्थित सर्व राज्य आणि केंद्र सरकारी अधिकाऱ्यांना दिल्या.



सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांच्या उपस्थितीत राज्य तसेच केंद्र शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एमएसआरडीसी महामंडळ, वांद्रे येथे बैठक झाली. या बैठकीस मुंबई महानगर पालिका आयुक्त भूषण गगराणी, माहिती व जनसंपर्क महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस आयुक्त, मुंबई महानगर विकास प्राधिकरण, म्हाडा, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई विद्यापीठ, सीमा शुल्क, बेस्ट, एमआयडीसी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एचपीसीएल, बीपीसीएल, मध्य व पश्चिम रेल्वे, भारतीय जीवन विमा प्राधिकरण, राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फटीर्लायझर लि., भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, अदानी एअरपोर्ट, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य विकास पायाभूत सुविधा महामंडळ, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, महाजनको, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, अदानी पॉवर, टाटा ट्रस्ट, टाटा पॉवर तसेच केंद्र व राज्य शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## प्रेमाला विरोध केल्याने तरुणाचा खून

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २२ :

प्रेमाला विरोध केल्याने अल्पवयीन मुलाने साथीदारांच्या मदतीने प्रेयसीच्या मानलेल्या भावाचा निर्घृण खून केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी ग्रामीण पोलीस दलाच्या राजगड पोलिसांकडून तिघांना अटक करण्यात आली असून, तीन अल्पवयीनांना ताब्यात घेतले आहे. जुन्या कात्रज बोगद्याजवळील डोंगरावर कात्रजमधील तरुणाचा खून करण्यात आला होता. या प्रकरणाचा राजगड पोलिसांनी तपास करून गुन्ह्याचा छडा लावला. सौरभ स्वामी आठवले (वय २५, रा. पंचरत्न सोसायटी, मांगडेवाडी, कात्रज) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या कात्रज बोगद्याजवळ डोंगरावर एका तरुणाचा मृतदेह पडल्याची माहिती तेथे फिरायला गेलेल्या नागरिकांनी पोलिसांना दिली. त्यानंतर राजगड पोलिसांचे पथक तेथे पोहोचले. पोलिसांनी चौकशी करून मृतदेहाची ओळख पटविली. तेव्हा मृतदेह सौरभ आठवले याचा असल्याची माहिती मिळाली. सौरभ १८ ऑगस्ट रोजी घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार नातेवाईकांनी राजगड पोलिसांकडे दिली होती. तांत्रिक तपासात सौरभचा खून अल्पवयीनांनी केल्याची माहिती पोलीस कर्मचारी नलावडे यांना मिळाली. आरोपी कात्रज घाट परिसरातील गोगलवाडी येणार असल्याची मााहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून तिघांना ताब्यात घेतले.

## भाजपचा नवा डाव
### मराठी मतांवर थेट फोकस

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २२ :

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी सत्ताधारी भाजपने मराठी मतदारांवर खास डोळा ठेवला आहे. निवडणुकीच्या रणशिंगाची चाहूल लागताच भाजपने आपला प्रचाराचा अस्सल मराठी अवतार सादर करण्याची तयारी सुरू केली आहे. गणेशोत्सवाला राज्य सरकारने दिलेला राज्य महोत्सवाचा दर्जा भाजपसाठी मोठं शस्त्र ठरणार आहे. या निमित्ताने मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपर्यंत थेट पोहोचण्याचा डाव आखला गेला आहे. विविध स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम आणि आकर्षक कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी मतांची मोट बांधण्याची मोहीम राबवली जाणार आहे.

कोकणात गणेशोत्सवाला जाणाऱ्या भाविकांसाठी भाजपने थेट मोदी एक्सप्रेसची जुगाड केली आहे. तब्बल दोन विशेष गाड्या आणि ५०० पेक्षा अधिक बसेस सोडून मराठी जनतेचे मन जिंकण्याचा प्रयत्न होणार आहे. कोकण रेल्वे मार्गावरून होणारी ही मोदी एक्सप्रेस यात्रा फक्त प्रवासापुरती मर्यादित राहणार नाही, तर यातून भाजपचा संदेश प्रत्येक प्रवाशापर्यंत पोहोचवण्याचा राजकीय प्रयत्न होणार आहे. मुंबई महापालिकेवर पुन्हा एकदा आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी भाजपने घेतलेली ही आक्रमक झेप शिवसेना (उद्धव) आणि ठाकरे गटासाठी डोकेदुखी ठरणार हे नक्की. कारण, आतापर्यंत गणेशोत्सव म्हटले की तो शिवसेनेच्या राजकीय ओळखीचा भाग मानला जात होता. पण आता भाजपने या उत्सवावरच डोळा ठेवत थेट मराठी मने जिंकण्याचा मार्ग निवडला आहे.

## राज्यात पावसाचा १४ जिल्ह्यांना फटका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

राज्यात विशेषतः मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नांदेड आणि पश्चिम महाराष्ट्राला पावसाने झोडपून काढले. १९ आणि २० ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे सुमारे १४ जिल्ह्यांमधील जनजीवन विस्कळीत झाले. या पावसामुळे २१ लोकांचा मृत्यू झाला, तर अनेक जनावरेही दगावली. एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या पथकांसह लष्करालाही मदतीसाठी पाचारण करण्यात आले होते. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाला असून, परिस्थिती हळूहळू पूर्वपदावर येत आहे.

सात दिवसांत सुमारे अडीच कोटी लोकांना अलर्ट मेसेज : पावसाचा जोर ओसरला असला तरी पुढील संभाव्य धोके लक्षात घेता काही जिल्ह्यांमध्ये एनडीआरएफ आणि एसडीआरएफची पथके अलर्ट मोडवर ठेवण्यात आली आहेत. राज्य आपत्कालीन कक्षाचे संचालक भालचंद्र चव्हाण यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पावसाचा अंदाज बांधणे कठीण असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून ही पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. गेल्या सात दिवसांत सुमारे २५३.७४ कोटी लोकांना २३९ वेळा आपत्कालीन परिस्थितीबाबत अलर्ट मेसेज पाठवण्यात आले, असेही चव्हाण यांनी नमूद केले. दरम्यान, राज्यात मदत पोहोचवण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

रविवार, १७ ऑगस्टच्या रात्रीपासून सुरू झालेल्या पावसामुळे सोमवारी १८ ऑगस्ट रोजी पावसाचा जोर प्रचंड वाढला. मुंबईसह राज्यातील १४ जिल्ह्यांना याचा मोठा फटका बसला. नांदेड जिल्ह्यात तर ढगफुटीसदृश स्थिती निर्माण झाली, ज्यात ८ लोकांचा मृत्यू झाला. मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी आणि रायगड यांसारख्या जिल्ह्यांमधून ६,६६४ लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले होते. यापैकी दोन हजारांहून अधिक लोक घरी परतले असून, ४,४६१ लोक अजूनही निवारा केंद्रांमध्ये असल्याचे सांगण्यात आले आहे.

## पुण्यात कोयता गॅंगनंतर आता 'मास्क मॅन'ची दहशत

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २२ :

पुण्यातील गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसत आहे. कुठे कोयता गॅंग तर कुठे ड्रिंक अँड ड्राइव्ह, अशा अनेक घटनांनी पुण्याचे नाव काहीसे खराबच होत चालले आहे. त्यात आणखी भर पडली असून आता पिंपरी चिंचवड भागात 'मास्क मॅन'ने दहशत पसरवली आहे.

पिंपरी चिंचवड भागात एका मास्क मॅनने दहशत पसरवली आहे. हा व्यक्ती मास्क घालून दिवसाढवळ्या हातात चाकू घेऊन फिरताना दिसला. यामुळे या भागातील लोकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. निगडी येथील बजाज ऑटोमोबाइल समोर असलेल्या पेट्रोल पंप परिसरात हा मास्क मॅन दिसला. यावेळी त्याच्या हातात धारदार चाकू होता. हा चाकू कोणाला मारण्यासाठी होता की लोकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी होता, हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

मास्क घालून अशा प्रकारे लोकांच्या मनात दहशत पसरवणे अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. या मास्क मॅनला लवकरात लवकर ताब्यात घेण्याची मागणी स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे. पिंपरी चिंचवड शहरात वावरणाऱ्या मास्क मॅनला पोलिस कधी अटक करणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, यापूर्वी काही महिन्यांपूर्वी पुण्यात कोयता गॅंगचे चांगलीच दहशत माजवली होती. ही टोली हातात कोयता घेत भर दिवसा दुकानदारांवर तसेच कोणावरही वार करत सुटत होते. मे महिन्यात काही तरुणांचा वाद झाला व या वादाचे रूपांतर नंतर मोठ्या राड्यात झाले. यावेळी त्यांनी कोयता काढून एकमेकांवर सपासप वार करत जीवघेणा हल्ला केला होता.

## मुंबईतील बाप्पाच्या नावे नवा विक्रम

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :

मुंबईतील गणेशोत्सवाचा उत्सव यावेळी आणखी खास झाला आहे. किंग्ज सर्कल येथील जीएसबी सेवा मंडळाने त्यांच्या गणपती मंडळासाठी 474 कोटी रुपयांची विमा पॉलिसी घेऊन एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यामुळे आता हे मंडळ शहरातील सर्वात श्रीमंत गणेश मंडळ बनले आहे.



४७४ कोटींची विमा पॉलिसी

न्यू इंडिया ॲश्युरन्सद्वारे केली जाणारी ही नवीन विमा पॉलिसी अनेक प्रकारचे संरक्षण प्रदान करते. यामध्ये सोने आणि चांदीच्या वस्तूंचे कव्हर, वैयक्तिक अपघात विमा, आगीशी संबंधित घटनांचे कव्हर आणि सार्वजनिक जबाबदारी विमा यांचा समावेश आहे. या पावलामुळे गणेशोत्सवादरम्यान अनपेक्षित नुकसानी पासून संरक्षण मिळेलच, शिवाय मंडळांच्या धार्मिक कार्यक्रमांना आणि भव्य उत्सवांनाही बळकटी मिळेल. मुंबईतील गणेश उत्सव मंडळांमध्ये ही विमा पॉलिसी आतापर्यंतचा सर्वात मोठा विक्रम ठरली आहे.

दरवर्षी मुंबईतील किंग्ज सर्कलमध्ये एक भव्य गणपती मंडप उभारला जातो, जो गौड सारस्वत ब्राह्मण (जीएसबी) सेवा मंडळ आयोजित करते. इकॉनॉमिक टाईम्सच्या वृत्तानुसार, हे मंडळ मुंबईतील सर्वात श्रीमंत गणेश मंडळ मानले जाते. यावेळी त्यांच्या 5 दिवसांच्या उत्सवासाठी (7 ते 11 सप्टेंबर) मंडळाने 474.4 कोटी रुपयांचा विमा कव्हर घेतला आहे. मात्र, यासाठी भरलेल्या प्रीमियमची रक्कम उघड केलेली नाही.

### ऐश्वर्या आणि आराध्या बच्चन यांची श्रद्धा

ऐश्वर्या राय बच्चन अनेकदा गणेश चतुर्थीला आई वृंदा राय आणि मुलगी आराध्या बच्चनसोबत जीएसबी गणपतीला भेट देते. गर्दीत अडकूनही, ती तिच्या आई आणि मुलीच्या सुरक्षिततेची खात्री करून पूर्ण भक्तीने परमेश्वराचे आशीर्वाद घेते. तिचे अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झालेले आहेत, ज्यामध्ये ती सामान्य भक्ता प्रमाणे बाप्पाची पूजा आणि प्रार्थना करताना दिसते. जीएसबी गणेश मंडळाची सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे धर्म, कला आणि समाजसेवेचा संगम पाहायला मिळतो. सामान्य माणूस असो वा मोठा स्टार, इतर मंडळांमध्ये दिसणारी व्हीआयपी संस्कृती येथे दिसत नाही.

## नागपुरातील अनोखी लोकपरंपरा–मारबत





शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ

महाराष्ट्र सांस्कृतिक दृष्ट्या विविध परंपरेने नटलेला आहे. जत्रा, यात्रा, मिरवणूका, सण-उत्सव हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक लोकवैभव. गतिमान बदलत्या काळात अनेक परंपरा आज लुप्त झाल्यात; तर काही अद्यापही तग धरून आहे. बहुतांश ठिकाणी ग्रामीण जीवनातील लोक परंपरा आजही कायम दिसते. परंतु शहरी भागातील लोक परंपरा जतन असल्याचा प्रसंग अथवा क्षण अभावानेच सापडतो. अशापैकीच एक लोक परंपरा राज्यातील नागपूर शहराने अबाधीत ठेवली आहे.

बैलपोळा सणाच्या पाडव्याला नागपूरात काळी आणि पिवळी मारबत मिरवणूक निघते. हा उत्सव सार्वजनिक असतो. भारतात इंग्रजांचे राज्य असताना लोकांना एकत्र येणार बंदी होती.परंतु धार्मिक कार्यावर इंग्रजांचा हस्तक्षेप नव्हता. त्यामुळे धार्मिक कायार्साठी लोकांना एकत्र येत असल्याने लोकमान्य टिळकांनी राष्ट्रवादी विचारांच्या प्रचाराच्या उद्देशाने पुण्यात १८९३ साली सार्वजनिक गणेशोत्सवाचा प्रारंभ केला. परंतु नागपुरात त्याही पूर्वी १९८१ पासूनचं मारबत उत्सवाला प्रारंभ झाला होता.

### मारबतचा पूर्व इतिहास

ब्रिटिश राजवटीत लोक त्यांच्या अन्याय अत्याचाराने त्रस्त होते. त्यावेळी देश स्वातंत्र व्हावा या लोक भावनेतून पिवळी मारबत सुरू केली, तर इंग्रज शासनाला बाकाबाई भोसले (भोसले राजकारणातील) ही इंग्रजांना जाऊन मिळाली. त्यामुळे बाकाबाईचे प्रतीकात्मक रूप म्हणून काळी मारबत सुरू करण्यात आली. मुळात या मारबतीची परंपरा ही आदिवासींची आहे असे सांगितले जाते.

### पिवळी मारबत व स्वरूप

पिवळी मारबत या संकल्पने मागे द्वापार युगातील कृष्ण अवताराची कथा सांगितली जाते. त्यानुसार दृष्टकंसाने बाल कृष्णाला मारण्यासाठी पूतना नामक राक्षसनीला पाठविले होते. ती आपल्या स्तनाला विष लावत बालकृष्णाला स्तनपान करविते. परंतु श्रीकृष्णाने तिच्या प्रत्युत्तरात शाप दिला की, कलियुगात तिचे पूजन केले जाईल. हीच ती पिवळी मारबत होय. मारबत म्हणजे धिंड काढणे होय. पूर्वी धिंडीचे स्वरूप होते. परंतु नंतरच्या काळात तिला देवी म्हणून पूजा केली जाते. स्त्रिया तिची ओटी सुद्धा भरतात. तिची स्थापना पाच दिवसाआधी केली जाते व मारबतीतील मूर्ती बनविण्यासाठी दरवर्षी नागपंचमीला प्रारंभ होतो. त्यासाठी प्रथम काठ्या व बांबूचा ढाचा बनविला जातो, त्यावर कागद रंग लावून पिवळे स्वरूप दिले जाते. धार्मिक स्वरूप बघून ब्रिटिशांचा त्याकाळी विरोध नव्हता. पुढे काळी मारबत सुद्धा सुरू झाली.

### काळी मारबत इतिहास व स्वरूप

नागपूर येथील महाराणी बाकाबाई सन १७९० ते १८५८ या नागपूर घराण्याचे राजे रघुजी भोसले (दुसरा) यांच्या पत्नी होत्या. रघुजी राजे ह्या अल्पवयीन राजाला दत्तक घेऊन राज्यकारभार केला. हे दत्तक विधान लॉर्ड डलहौसीने नामंजूर करूनही तिने इंग्रजांशी हात मिळवणी केली. त्यामुळे १८५७ चा उठाव यशस्वी होऊ शकला नाही. तिच्या या निषेधार्थ म्हणून ही काळ्या रंगाची काळी मारबत काढण्यात येते. असा पूर्व इतिहास सांगितला जातो. त्यामध्ये अनेकांचे आजही मतभेद कायम आहेत.

### बडग्यांचा इतिहास व स्वरूप

अनेक वाईट विचार, प्रसंग, घटना, प्रसंगांना मूकपणे तटस्थपणे धिक्कार न करता बघणाऱ्यांचा प्रतीकात्मक निषेध म्हणजे बडगे होय. या बडग्यांच्या गळ्यात मोडके झाडू, फाटके कपडे, फुटके डब्बे, टायरचे तुकडे त्यांच्या माळा गळ्यात घालतात. बडग्याच्या हातात मुसळ आणि कमरेला उखळ बांधलेले असते. एकंदरीत त्यांच्या कृतीचे निषेध म्हणून प्रतीकात्मक स्वरूप बडग्यांचे असते.

पौराणिक आणि अनिष्ठेपासून सकारात्मकतेकडे नेणारी मारबत मिरवणूक असते. वाईट परंपरा, रोगराई, संकट, समाजातून नष्ट व्हाव्यात आणि चांगल्या गोष्टींचे स्वागत करण्यासाठी नागपूरकरांचे मारबत लोकोत्सव असतो. या मिरवणुकीच्या दरम्यान "ईडा, पिडा, रोगराई, जादूटोणा, महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अत्याचारी घेऊन जागे मारबत..!"

असे म्हणत समाजातील वाईट गोष्टींना संपविण्याचा सामूहिक प्रयत्न असतो. तसेच राजकारणातील व समाजातील चुकींच्या लोकांच्या मानसिकतेचा विचारांचा विरोध व निषेध यावेळी सामूहिकरीत्या केल्या जातो.

या उत्सवात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील मुद्द्यांसह स्थानिक समस्यांवर भाष्य करणारे फलक, सूचना, ओळी, जनतेच्या मनातील प्रशासनाच्या विरोधातील राग आणि संतापही व्यक्त होतो. या निमित्ताने समाजातील वाईट चालीरीती, प्रथा दूर करण्याचे साकडे मारबताकडे घातले जाते. अखेर या मारबतीचे दहन केले जात. त्यानंतर परत नव्याने सकारात्मकतेची सुरुवात होते असा समज आहे. अशी ही अनोखी ही लोकपरंपरा संपूर्ण देशाच्या पातळीवर नागपुरात आजही कायम आहे.

# महासागर अमरावती

शनिवार, दि. 23 ऑगस्ट 2025

पान 3




मोर्शी - तालुक्यातील भाईपूर येथे मोठ्या उत्साह मध्ये बैल पोळा साजरा करण्यात आला. शेतकरी अंकुश बनसोड आपल्या जोडीची नित्याने कृतज्ञ व्यक्त पूजन करून बैल पोळा मोठ्या उत्साहाने साजरा केला. यावेळी सर्व शेतकरी बांधवांनी ऐकमेकांना बैलपोळा सणाच्या हार्दिक शुभेच्छासुद्धा दिल्या.

## बडनेरात महाविद्यालयीन लिपिकाची हत्या

### रस्त्यालगत पडून होता मृतदेह | अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा, (दि. 22)**- बडनेरा शहर हादरवून टाकणारी धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. 22 ऑगस्ट) सकाळी उघडकीस आली. बडनेरा जुनी वस्ती स्थित तिलकनगर परिसरातील रस्त्यावर एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. मृत व्यक्तीचे नाव अतुल ज्ञानदेव पुरी (वय 42, रा. पुंडलिक बाबा नगर, अमरावती) असे असून, ते बुलडाणा जिल्ह्यातील नांदुरा स्थित पुंडलिक महाराज महाविद्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत होते. अतुल पुरी यांना रस्त्यात अडवून, त्यांची धारदार शस्त्रांनी हत्या करून, आरोपी पसार झाल्याचे दिसून आले आहे. याप्रकरणात बडनेरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदवून, आरोपींचा शोध सुरु केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अतुल पुरी हे दररोज आपल्या दुचाकीने सकाळी 7 वाजता महाविद्यालयातील कर्तव्य बजावण्यासाठी निघत होते. ते आपली दुचाकी बडनेरा रेल्वेस्थानकावर ठेऊन, ते पुढील प्रवास रेल्वेने करत नांदुरा येथील महाविद्यालयात कर्तव्यावर जात होते. अशातच 22 ऑगस्ट रोजी ते सकाळी दुचाकीने घरून निघाले होते. त्यानंतर त्याचा मृतदेह बडनेरा जुनी वस्ती स्थित तिलकनगर परिसरातील जोंधळेकर लॉन शेजारील रस्त्याच्या कडेला पडलेला आढळला. त्यामुळे त्यांना हल्लेखोरांनी त्यांना रस्त्यात अडवून, त्यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केल्याचे निदर्शनास आले. या घटनेची माहिती स्थानिक नागरिकांनी बडनेरा पोलिसांना दिली. त्यानंतर बडनेरा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक तपासात मृतदेहावर गंभीर जखमा व धारदार शस्त्राचे घाव आढळून आले. त्यामुळे ही घटना अपघात नसून सरळसरळ खून करून मृतदेह रस्त्यावर फेकल्याचे दिसून आला, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. अपघाताचा बनाव करून गुन्हा दडपण्याचा प्रयत्न झाल्याचेही तपासातून दिसून येत आहे. या घटनेमुळे परिसरात भीती व तणावाचे वातावरण पसरले असून, मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. या प्रकरणाचा पुढील तपास बडनेरा पोलीस करत आहेत.





#### खुनाचा गुन्हा दाखल

या घटनेच्या माहितीवरून घटनास्थळी सहायक पोलिस आयुक्त कैलास पुंडकर, क्राईमचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण तसेच बडनेरा पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांनी पाहणी करून पुरावे ताब्यात घेतले. मृतदेहाचा पंचनामा करून तो शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून मृताची दुचाकी ताब्यात घेतली आहे. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी सांगितले.

## दुचाकी व चारचाकीची समोरासमोर धडक

### चिमुकलीसह युवकाचा मृत्यू | कडाव येथे भीषण अपघात

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी, (दि. 22)** - तालुक्यातील कडाव येथे रविवारी संध्याकाळी दुचाकी आणि चारचाकीमध्ये झालेल्या समोरासमोर अपघातात युवकासह एका चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या भीषण धडकेत आणखी एक मुलगी गंभीर जखमी झाली असून तिला उपचारासाठी अमरावती जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

सविस्तर माहिती अशी की, धारणी-महू येथील मुकेश भिलावेकर हे गावातील नातेवाईकांना घेण्यासाठी वर्धा येथे गेले होते. तेथे शिक्षण घेणारी अनुष्का दुर्गादास धांडे (वय 6) आणि किर्ती रामचंद्र ठाकरे (वय 13, इ. 7 वी) यांना पोळा सणानिमित्त घरी आणण्यासाठी ते दुचाकीवर गेले होते. परतीच्या प्रवासात धारणी-हरिसाल मार्गावर कडावजवळ ही दुर्घटना घडली.

समोरून येत असलेल्या भरधाव स्कॉर्पिओ (क्र. एम.पी. 09 झेडडी 0028) ने दुचाकीला जबर धडक दिली. या अपघातात अनुष्का धांडे आणि दुचाकीस्वार मुकेश भिलावेकर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर किर्ती ठाकरे गंभीर जखमी झाली असून तिला प्राथमिक उपचारांनंतर पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय, अमरावती येथे हलवण्यात आले आहे.

या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर गावात आनंदाचे वातावरण असताना या दुर्घटनेने शोककळा पसरली आहे. अपघातग्रस्तांच्या कुटुंबीयांवर दुर्दैवी संकट कोसळले असून गावकऱ्यांनीही तीव्र दुःख व्यक्त केले. सदर घटनेचा पुढील तपास धारणी पोलिसांकडून सुरू असून अपघातातील वाहनचालकाविरुद्ध कारवाई होण्याची शक्यता आहे.



## निंभोरा लाहेतील बायोकोल फॅक्ट्रीतील जुगार अड्ड्यावर धाड

### गुन्हे शाखेची धडक कारवाई

### 10.11 लाखांचा मुद्देमाल जप्त

### 8 आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22)** - पोलीस आयुक्तालय हद्दीत अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी सुरू केलेल्या मोहिमेअंतर्गत गुन्हे शाखेने आणखी एक मोठी कारवाई करत निंभोरा लाहे येथील संकल्प इंडस्ट्री या बायोकोल फॅक्ट्रीत चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत 10 लाख 11 हजार 190 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एकूण 8 जुगारींना अटक करण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशावरून आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पथकाने गुप्त माहितीदाराच्या मदतीने 21 ऑगस्ट रोजी ही धडक कारवाई केली. संकल्प इंडस्ट्रीच्या ऑफिसमध्ये मालक श्रीकांत पिंजरकर याच्यासह अन्य 7 जण एक्का-बादशहा पत्त्यांवर हारजीताचा जुगार खेळताना आढळले. ताबडतोब सर्वांना ताब्यात घेऊन रोख रक्कम, मोबाईल, वाहने व जुगार साहित्य जप्त करण्यात आले. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून 61,040 रुपयांची रोख, 8 नग मोबाईल, 2 चारचाकी वाहने व जुगार साहित्य असा एकुण 10,11,190 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. फॅक्ट्री मालक श्रीकांत अशोकराव पिंजरकर (42, साईनगर, अमरावती), उमेश मंगलप्रसाद पांडे (51, नवी वस्ती, बडनेरा), उज्वल गोपाळराव लाहे (42, रामायण नगर, बडनेरा), प्रकाश भिमराव पडोळे (54, ग्राम दाभा, बडनेरा), नितीन गुलाबराव सूने (47, दाभा, बडनेरा), किसन विठ्ठलराव देशमुख (42, दाभा, बडनेरा), संजय वामनराव इंगोले (60, रा. श्रद्धा कॉलनी, अमरावती), स्वप्नील गणेशराव ठाकरे (37, अभियंता कॉलनी, नवाथे, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. या सर्व आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन बडनेरा येथे कलम 4, 5 महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात एपीआय महेश इंगोले, अमोल कडू, पोलिस हवालदार गजानन ढेवले, सुनील लासूरकर, जहीर शेख, आस्तीक देशमुख, सचिन बहाळे, संग्राम भोजने, अतूल संभे, विकास गुडधे, मंगेश शिंदे, राहुल देंगेकर, रंजीत गावंडे, चेतन शर्मा यांनी केली. या कारवाईमुळे पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील जुगार अड्ड्यांना मोठा धक्का बसला असून, पुढील तपास बडनेरा पोलीस करीत आहेत.



## चांदुर रेल्वे पोलीसांनी पकडला 111 किलो गांजा

### दोन तस्करांविरुद्ध धडक कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे (दि. 22)** चांदुर रेल्वे पोलिसांनी एका चारचाकी वाहनातून होणार्या गांजा तस्करीचा भंडाफोड केला. या धडक कारवाईत एकूण 111.6 किलो गांजा जप्त करण्यात आला असून, आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, दोन इसम गांजा विक्रीसाठी चारचाकी वाहनाने नांदगाव खंडेश्वर रोडकडे जात आहे. या माहितीवरून चांदुररेल्वे पोलिसांनी नांदगाव खंडेश्वर रोडवरील पळसखेड फाटा येथे बोलेरो वाहन क्रमांक ओआर 10 एच 6256 ला थांबवले. त्यावेळी वाहनात चालक यश भास्करराव लाहे (वय 21, रा. पिपंळगाव बैनाई, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती) व फिरोज सैयद अनवर सैयद (वय 36, रा. प्रकाश नगर, न्यू आगरी पाडा, सांताक्रुझ, मुंबई) बसले होते. पोलिसांनी त्यांच्या वाहनातून 111.6 किलोचा गांजा (कीमत 25,66,800 रुपये), बोलेरो वाहन (10,50,000 रुपये), ॲपल मोबाईल (1 लाख), रेडमी मोबाईल (9 हजार), टॅब (10 हजार), 6 हजार 600 रुपयांची रोख असा एकुण 37 लाख 42 हजार 400 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणात सदर आरोपींविरुद्ध कलम 8(ष्ट), 20(क्ष)(द्वद्व)(ष्ट), 29 एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल पवार, पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात एपीआय शरद आहेर, पीएसआय रोहीत कुदळे, नंदलाल लिंगोट, पोलीस अंमलदार शिवाजी घुगे, प्रविण मेश्राम, राहुल इंगळे, निलेश रिठे, प्रशांत ढोके, संदीप वासनिक, संदीप बटुकले, ऋषीकेश जगदाळे, महिला पोलीस अंमलदार किर्ती सयाम, चालक प्रकाश बिरोले, चंद्रकांत गाडे यांचा समावेश होता.

## गुटखा वाहतूकीत 11.29 लाखांचा मुद्देमाल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22)** महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्रीच्या उद्देशाने वाहतूक करणाऱ्या आरोपीविरुद्ध अमरावती स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल 11 लाख 29 हजार 680 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

माहितीनुसार, विनोद उर्फ विनायक अशोकराव काळे (वय 37, रा. करजगाव, जि. अमरावती) हा इको कारमधून गुटख्याची अवैधरित्या वाहतूक करीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून 22 ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शिरजगाव हद्दीत गस्त घालत असताना ही कारवाई करण्यात आली. आरोपीला पोलिसांची चाहूल लागताच तो पसार झाला. मात्र त्याच्या घरासमोरील अंगणात उभी असलेली ग्रे रंगाची मारुती सुझुकी इको कार (क्रमांक एमएच 27-बीव्ही 8487) तपासणीस घेण्यात आली. त्यावेळी वाहनातून 6 तरटाचे पोते व 1 पांढऱ्या रंगाचे पोते मिळाले. त्यामध्ये शासनाने बंदी घातलेला गुटखा सापडला. पोलिसांनी 2,29,680 रुपयांचा गुटखा, 9,00,000 रुपयांचे वाहन असा एकुण 11,29,680 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हा संपूर्ण मुद्देमाल व वाहन करजगाव पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला असून, आरोपीचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात पो.उपनि. विशाल रोकडे, अंमलदार संतोष तेलंग, दीपक पाल, राजेश कासोटे, दीपक पाटील व किशोर सूने यांचा समावेश होता.



## संत्रा उत्पादक शेतकरी आक्रमक

### वाढीव मदत व खरीप पिकांचे स्वतंत्र पंचनामे करण्याची तालुका काँग्रेस मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, (दि. 22)**- तिवसा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटीसदृश्य पावसामुळे सोयाबीन, तूर, कपाशी यांसारख्या खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून, त्यात बुरशीजन्य आजारांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. याचबरोबर संत्रा उत्पादक शेतकरीही या आपत्तीमुळे मोठ्या संकटात सापडले असून, त्यांना स्वतंत्र मदतीची मागणी तालुका काँग्रेस कमिटीने आज तहसील कार्यालयासमोर आंदोलनातून केली.

संत्र्याच्या मृग व आंब्या बहाराला फळगळती लागून फायटोपथेरा या आजाराचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. आर्वी तालुक्यात जिल्हाधिकाऱ्यांनी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे स्वतंत्र सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले असले तरी तिवसा तालुक्यात अद्याप सर्वेक्षण झालेले नाही, अशी खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली. मागील वर्षी अनेक आंदोलनांनंतरच मदत मिळाली होती; मात्र यंदा सरसकट नुकसानभरपाईत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला.

तालुका काँग्रेस कमिटीने स्पष्ट केले की खरीप पिकांसह संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे पंचनामे महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने तातडीने करावेत. अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला. शासन निर्णयानुसार नैसर्गिक आपत्तीत बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याची तरतूद आहे. त्यानुसार तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांना तातडीने वाढीव मदत द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.

या वेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वैभव वानखडे, सुरेशराव मेटकर, रवी राऊत, प्रफुल देशमुख यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व पदाधिकारी उपस्थित होते.



## कष्टकरी गाढवांचा पोळा

### विदर्भातील रासेगावची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा

**नितीन दुर्बूडे**


**पथ्रोट, (दि. 22)** - विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील रासेगाव येथे दरवर्षी बैलपोळ्याप्रमाणेच गाढवांचा पोळा मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. अचलपूर तालुक्यातील ही आगळीवेगळी परंपरा पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे.


बैलांना जशी पोळ्याच्या दिवशी अंघोळ घालून, साजश्रृंगार करून त्यांची पूजा केली जाते, तसाच मान रासेगावात गाढवांना दिला जातो. या दिवशी गाढवांना रंगरंगोटी करून सजवले जाते. त्यांना पुरणपोळी, कुरडया, पापड-भजी यांसारख्या गोडधोड पदार्थांचा नैवेद्य दाखवला जातो. विशेष म्हणजे या दोन दिवसांत गाढवांकडून कोणतेही काम करून घेतले जात नाही. वर्षभर काम करणाऱ्या गाढवांना दिली जाणारी ही विश्रांती व सन्मानाची परंपरा आजही येथे टिकून आहे.


गावात भोई समाज मोठ्या संख्येने आहे. त्यांचा उपजीविकेचा आधार म्हणजे गाढव. मालवाहतुकीसाठी, विटा-माती नेण्यासाठी वर्षभर गाढवांचा वापर केला जातो. त्यामुळे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना देवत्व बहाल करून हा गाढवांचा पोळा साजरा केला जातो. मागील 45 वर्षांपासून ही परंपरा जपली जात असल्याचे वडीलधाऱ्यांचे सांगणे आहे.

सामान्यतः गाढव हा शब्द समाजात हेटाळणीसाठी वापरला जातो; पण रासेगावात मात्र गाढव पूजनीय मानले जाते. श्रमाला महत्त्व देणारा भोई समाज गाढवांच्या श्रमालाही पवित्र मानतो. पोळ्याच्या दिवशी ही प्राणी झुली, फुलं, रंगीबेरंगी नक्षी यांनी सजवलेले दिसतात. त्यांच्या वेगळ्या ऐटीत हा दिवस साजरा होतो.

ग्रामस्थांच्या मते, पूर्वी फार थोड्या गाढवांची पूजा होत असे; मात्र आज त्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. जग गाढवाची निंदा करेल, पण आम्ही त्यांचे ऋण मानतो असे येथील समाज बांधव सांगतात. गाढवांचा पोळा म्हणजे कष्टकरी प्राण्याला मान व सन्मान देणारी संस्कृती. श्रमाला देवत्व बहाल करणारी ही स्थानविशिष्ट परंपरा विदर्भाच्या लोकजीवनातील जपण्याजोगा वारसा आहे.








आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# नागपूरकरांनी कायम ठेवली बडग्या-मारबत परंपरा!

***ईडा पिडा घेऊन जाऽऽ गे मारबत..
मना मनातली अस्वस्थता,
हेवेदावे, भीती, रोगराई
घेऊन जाऽऽ गे मारबत..***

पोळ्याच्या पाडव्या दिनी मारबतीची परंपरा व ऐतिहासिक मिरवणूक नागपूर नगरीचा ठेवा! ही मिरवणूक तर नागपूरची आन, बान आणि शान आहे, हा उत्सव त्या मागचा उद्देश! पूर्वी मारबत महोत्सव थोडा बिभत्सेकडे झुकलेला होता. त्यामुळे मारबत मिरवणुकीत जाणे हीन अभिरुचीचे मानले जायचे. पण आता परिस्थिती बदलली आहे.

---------------

भारतातला हा एकमेव उत्सव नागपूर शहरात संपन्न होत असतो, त्या मागे उदात्त हेतू आहे. हे लक्षात आल्याने आता मारबत मिरवणुकीतील असभ्यता बऱ्यापैकी कमी झालेली आहे. कित्येक भाविक स्वतःच्या समस्या दूर व्हाव्यात म्हणून मारबतीला नवस बोलतात.

वर्षानुवर्षे प्रचंड उत्साहात हा सोहळा साजरा होतो, होत राहील. तेव्हा या मारबत सोहळ्यात सहभागी होऊ आणि म्हणूयात, सगळे अशुभ, अमंगळ घेऊन जाऽऽ गे मारबतऽऽऽ! या आरोळ्यांनी दरवर्षी तान्ह्या पोळ्याच्या दिवशी नागपूरातील महाल इतवारी परिसर दुमदुमुन गेलेला असतो. मारबत हा सोहळा संपूर्ण भारतात फक्त नागपुरातच भव्य दिव्य स्वरुपात साजरा होतो. मारबतही नागपूरकरांची अशी ग्रामदेवता आहे की ती या गावावर येणारी सगळी संकटे, आपल्या सोबत दूर घेऊन जाते आणि विसर्जित होते.


काळी मारबत १४५ वर्षांपासून चालू आहे. या काळ्या मारबतीचा संबंध महाभारत काळाशीही जोडल्या जातो. पुतना मावशीचे रूप धारण करून भगवान कृष्णाला मारण्याचा प्रयत्न केला आणि कृष्णाच्या हातून तिचा मृत्यू झाल्यावर गावकऱ्यांनी तिची धिंड अर्थात मारबत काढली आणि गावाबाहेर तिला जाळले. यामुळे गावावर पुन्हा कधीही समस्या, संकटे आली नाहीत, अशी आख्यायिका आहे. याच संदर्भाने नागपुरातही काळी-पिवळी मारबत काढण्यात येते. या मारबतींना शहराच्या बाहेर जाळल्याने शहरातील कुरीती आणि संकटे संपतात, अशी मान्यता आहे.

मूळात मारबत ही प्रथा मध्यप्रदेशातील काही आदिवासी जमातीत दिवाळीच्या रात्री पाळली जाते. विशिष्ट आकारातली मातीची मूर्ती ईडा पिडा, अमंगलतेचे प्रतिक म्हणून गावाबाहेर ढकलत नेतात. पण मग ही प्रथा खूप वेगळ्या स्वरूपात नागपुरात कशी रुजली?

यामागचा इतिहास असा की, महाराणी बाकाबाई भोसले या नागपूर भोसल्यांच्या राणीने इंग्रजांशी तथाकथित हातमिळवणी केली. त्यामुळे नागपूरचे समाजमानस क्षुब्ध झाले. या घडल्या घटनेचा मोठ्या प्रमाणावर निषेध करण्यासाठी बाकाबाईला स्वार्थी, देशद्रोही ठरवून त्यांचे प्रतिक म्हणून काळ्या मारबतीचा जन्म झाला. तसेच त्यांचे पती रघुजीराजे भोसले (द्वितीय) यांनी त्यांना रोखले नाही म्हणून त्यांचे प्रतिक बडग्याच्या रूपाने अवतरले.

पुढे इंग्रजांना नामोहरम करण्यासाठी कर्तबगार बाकाबाई भोसल्यांची ती रणनीती होती हे सिद्ध झाले. पण सुरू झालेली प्रथा बंद पाडणे नागपूरकरांना शक्य झाले नाही. मग मारबत ही दुष्टता, अमंगळ रूढी यांचे वहन करून स्वतः सोबत घेऊन जाणारी देवता म्हणून जनमानसात रुजली आणि आता वर्षानुवर्षे ही प्रथा पाळली जाते. तर, विविध सामाजिक समस्या, अनिष्ट रूढी, परंपरा यांचं प्रतिक म्हणून विविध पिवळी मारबत निघते.



वैदिक व नंतरच्या काळात बरेचदा वामनाचा उल्लेख आलेला आहे. बुटक्या आणि खुज्या माणसांच्या कथांमध्ये बुटका केवळ ठेंगणा नसतो तर त्यात असाधारण अशी दैवी शक्ती दिसते. हिमगौरी आणि सात बुटके ही कथा प्रत्येकाने वाचली असेलच.

बळीराजाला पाताळात गाडण्यासाठी विष्णूने वामनाचे रूप घेतले तसेच दुसऱ्याही एका कथेत धुंधु राक्षसाचा वामनाचे रूप घेऊन त्याने पराभव केला आहे. कश्यप आणि दनु यांचा मुलगा धुंधु स्वर्गप्राप्ती होण्यासाठी अश्वमेध यज्ञ करतो आणि देव घाबरून विष्णूकडे मदतीसाठी धावतात. त्यामुळे वामनाचे रूप घेऊन विष्णू धुंधुकडे आला आणि आल्यावर देविका नदीच्या पात्रात स्वतःला झोकून दिले.

यज्ञ सोडून सर्वजण त्याला वाचविण्यासाठी गेले तेव्हा तो म्हणाला की, निर्धन असा मी वर्षभरापासून गटांगळ्या खात आहे. धुंधुने त्याला वर मागण्यास सांगितले, तेव्हा वामन म्हणाला, मी बुटका, काय मागणार! मला माझ्या तीन पावलांएवढ्या लांबीची भूमी दे. धुंधुने मान्य केल्यावर वामनाने दोन पावलातच सबंध विश्व व्यापून टाकले आणि तिसरे पाऊल ठेवले ते धुंधु राक्षसाच्या पाठीवरच !



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

काळ्या मारबतीला पुतना मावशीचं रूप मानलं जातं. म्हणूनच तिच्या स्तनांमधून दुग्धधारा पाझरतात. अनंत चतुर्थीच्या अगोदर भागवत एकादशीला वामन जयंती असते. हे सर्व दिवस प्राचीन संस्कृतीच्या अद्भुत धाग्याने गुंफलेले आहेत. सर्वच पुराणांमध्ये आहे की, कंसाने पुतनेला बाळकृष्णाला मारण्यासाठी पाठविले. हरवंश आणि पद्मपुराणामध्ये ती रात्री येऊन लहान मुलांना मारते. काळ्या मारबतीने हाच रात्रीचा रंग ल्येवलेला आहे.

भागवत आणि ब्रम्हवैवर्त पुराणानुसार पुतनेच्या मनीचा भाव कसाही असा. श्रीकृष्णाच्या स्पर्शाने तिला मोक्ष प्राप्त झाला. बाळकृष्णाने मारल्यावर गावकऱ्यांनी तिच्या अंगाचे लचके तोडून तिला जाळले. पण त्या धुरातून दिव्य सुगंध येऊ लागला ती मुक्तात्मा झाली, म्हणुन तिचे महत्व.

जन्माष्टमी नंतर सणवार एकमेकांच्या हाता हात गुंफुन येतात पिठोरी अमास्येनंतर भाद्रपदात गौरी-गणपतीचे आगमन होते. खरंतर विचाऱ्या अमावस्येला सर्वजणच आळतात त्यादिवशी मुहूर्त, नवीन खरेदी, गोडधोड काही नसतं. अपवाद फक्त दोनच. एक श्रावणी अमावस्या आणि दुसरी लक्ष्मीपूजनाची आश्विन अमावस्या.

बैलपोळयाची दर्शग पिठोरी अमावस्या म्हणजे श्रावण आणि भाद्रपदामधला संधिकाल. बैलपोळयापासुन अनंत चतुर्दशीपर्यंत काही सण एकमेकांना बिलगुन उभे आहेत. त्यांच्यातला एक समान दुवा म्हणजे गल्ली-बोळींमधुन अत्यंत उत्साहाने काढण्यात येणाऱ्या मिरवणुका, बैलपोळ्याला सजवलेल्या बैलांची वाजत-गाजत मिरवणूक निघते तर दुसऱ्या दिवशी तान्ह्या पोळ्याला काळी-पिवळी मारबत निघते. अनंत चतुर्दशीला पुन्हा ढोलताशा वाजतो आणि एरवी सुस्तावलेली गल्लीबोळ त्यावर बेभान थिरकू लागते.

काळी व पिवळी मारबत असे दोन प्रकार आहेत. चार दिवस तिची विधिवत स्थापना केली जाते. लहान मोठे सांस्कृतिक कार्यक्रम या निमित्ताने होतात. महाप्रसादाचे आयोजन केले जाते आणि तान्ह्या पोळ्याच्या दिवशी यांची मिरवणूक काढून दहन केले जाते. लहान मोठे सगळेजण मिरवणूक मार्गाच्या दुतर्फा उभे राहून मारबत व बडग्या बघतात.

या दिवशी नागपूर व जवळपासच्या गाव-खेडयातील लोकं नागपूरला आपल्या लहानग्यांना घेऊन येतात. आज या शेकडो वर्षांच्या परंपरेला टिकवून नागपूरची ओळख आणि वेगळेपण हे औचित्य साध्य झाल्यामुळे आजही टिकून आहे. ऐतिहासिक सोहळा नागपूर नगरीचा ठेवा अनेकांना कळावा यासाठी हा लेखन प्रपंच !

तान्ह्या पोळ्याला भल्या पहाटे उठून आमच्या लाकडी बैलांची डागडुजी आम्ही करून ठेवायचो. कारण सकाळी १० वाजेपासूनच मारबती सुरू व्हायच्या. आई तहान लाडू, भूक लाडू डब्यात बांधून द्यायची. उड्या मारतच नेहरू चौकात जाऊन मोक्याची जागा पकडायची. बोंबा मारत इतवारीच्या मोहल्ल्यांमधून या मारबती मिरवतात. सोबत बडगेही असतात.

डेंग्युले घिऊन जाय गें मारबत..... बह्याडाले घेऊन जाय रे बडग्या... रस्त्याच्या दुतर्फा तोबा गर्दी असते. या गर्दीत हरवून विस्फारलेल्या डोळ्यांनी मारबत पाहणं म्हणजे वैदर्भीय संस्कृतीचा भव्य-दिव्य सोहळा अनुभवणं असतं.

नागपूरची मारबत प्राचीन संस्कृतीचे प्रतीक आहेच. त्याचबरोबर आपल्या सामूहिक सुख-दुखाःचा ती एक आश्वस्त हूंकार आहे. जेव्हा तिची लेकरं ईडा पिडा घेऊन जा गे मारबत अशी मनापासुन साद घालतात, तेव्हा ईडा-पीडा पोटात घेऊन ती माऊली धगधगत्या अग्नीला हसत हसत आलिंगन देते.

नागपूरकर भोसल्यांच्या शासनकाळात हा सण सुरू झाला. विदर्भात बहुधा सर्व ठिकाणी हा सण साजरा होतो. १७८९ मध्ये दुसरे श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (द्वितीय) यांनी हा उत्सव सुरू केला. त्यांनी लहान मुलांना बैलांचे महत्त्व कळावे म्हणून हा उपक्रम हाती घेतला होता. राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय) यांनी लाकडी बैल तयार करून सर्व लहान मुलांना वाटले.

जिवंत बैलांप्रमाणे त्या बैलांना सजविण्यात आले. आंब्याचे तोरण लावून जिलेबी, फळे, चॉकलेट, बिस्कीट पुडे अशा विविध वस्तू तेथे बांधण्यात आल्या. बैलाजवळ मुलांना उभे करून बैलांची पूजा केली जायची. पूजा संपल्यानंतर तोरण तोडून पोळा फोडून वाजत गाजत हनुमान खिडकीचे दर्शन घेऊन हनुमानाला नारळ फोडून परत आल्यावर मुलांना खाऊ, पैसे, वाटले जायचे. ही परंपरा सातत्याने सुरु होती. आजही नागपूरातील महाल परिसरात ती पहायला मिळते.

नागपूरसह विदर्भातील जवळपास सगळ्याच जिल्ह्यांमध्ये तान्हापोळ्या निमित्त सगळ्याच वयोगटातील लोक लाकडी बैल घेऊन त्याची पुजा करून हा सन आनंदाने साजरा करतात. त्यातच नागपुरातील सनियर भोसला पॅलेसमधील तब्बल आठ फुट उंचीचा लाकडी बैल सर्वांचे लक्ष वेधून घेतो. नागपुरातील या सणाला व लाकडी बैलांच्या (तान्हा) पोळ्याला तब्बल २३५ वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्रात सर्वत्र पोळा हा बैलांचा सण म्हणून साजरा होतो. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे तान्हा पोळ्याला

## एकमेकांत स्नेहबंध निर्माण व्हावेत

शहरातील अनेक भागात लाकडी बैलांचा पोळा भरतो. विदर्भ वगळता कुठेच हा पोळा साजरा होत नाही.

लहान मुले मोठे बैल नेऊ शकत नाहीत. ते त्यांना आवरू पण शकत नाहीत. म्हणून त्यांच्या हौस-मजेसाठी ह्यतान्हा पोळा' साजरा करण्यात येतो. त्या दिवशी लहान मुले लाकडापासून तयार केलेला बैल घेऊन खऱ्या बैलाप्रमाणेच या लाकडाच्या बैलाचा तान्हा पोळा साजरा करतात. तान्हा पोळा बहुतेक लहान मुलांच्या विरंगुळ्यासाठी साजरा करण्याची प्रथा आहे. बैल पोळ्याच्या पाडव्याला नागपूरसह पूर्व विदर्भात तान्हा पोळा उत्साहात साजरा केल्या जातो.

ही ऐतिहासिक परंपरा असलेल्या या पोळ्याची सुरूवात राजे रघुजी भोसले यांनी केली होती. तेव्हा पासुन तान्हा पोळा साजरा करतात. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा तान्हा पोळा हा शहराचा अनोखा सण विदर्भाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा पुरावा आहे.

या दिवशी लहान मुले आपआपल्या लाकडी बैलाला सजवतात. त्यानंतर एखाद्या जवळच्या मंदिरात किंवा मैदानावर हा तान्हा पोळा भरवल्या जातो. तो परिसर फुगे, तोरण, पताका लावुन सजविल्या जातो. प्रसंगी महादेवाची गाणी वाजविली जातात. नंदी बैल भगवान महादेवाचे वाहन असल्या कारणाने महादेवाच्या नावाचा जयजयकार केल्या जातो. त्यानंतर मुलांना काकडी व खोबऱ्याचा प्रसाद वाटप केल्या जाते आणि पोळा फुटला असे जाहीर केल्या जाते.

गेल्या काही वर्षांपासुन या पोळ्याला संस्कृती व स्पर्धा याची झालर लागली आहे. अनेक पालक आपल्या मुलाला वेगवेगळ्या वेशभुषांमध्ये सजवुन आणतात. पोळा फुटायच्या आधी या सगळ्या छोट्या मुलांचे वेशभुषा निरीक्षण केले जाते. तसेच त्यांनी सजावुन आणलेल्या बैलाचे निरीक्षण केले जाते. पोळा फुटल्यानंतर उत्तम वेशभुषा व बैलाची उत्तम सजावट केलेल्या मुलांना क्रमांका प्रमाणे नंबर देऊन, त्यांना योग्य ते पारितोषिक दिल्या जाते. त्याचप्रमाणे सगळ्याच मुलांना काहीनाकाही छोटी भेटवस्तु दिली जाते. त्यानंतर ही मुले घरी येतात.

ज्याप्रमाणे मोठ्या बैलांची सर्व प्रथम घरी पुजा केल्या जाते. त्याचप्रमाणे या लाकडी बैलांच्या पूजेला देखील घरुन सुरुवात होते. त्यानंतर ही मुले आपल्या शेजारी व नातेवाईकांकडे जाऊन बोजारा जमा करतात, म्हणजे त्यांना पैसे किंवा भेटवस्तु दिल्या जाते.

लहान मुलांना देखील शेतीचे व त्यात राबराब राबणाऱ्या बैलांचे महत्व कळावे. आपल्या कृषीप्रधान संस्कृती विषयी ते कृतज्ञ राहावे, यासाठी कदाचित तान्हा पोळा हा सण साजरा करण्याची प्रथा विदर्भात रुजली असावी. यामुळे लहान मुलांमध्येही बैल या पशुधनाबाबत माहिती होऊन महाराष्ट्रीयन संस्कृती जपल्या जाते. सर्वांना तान्हा पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा !

# राष्ट्रीय अंतराळ दिवस

आज २३ ऑगस्ट, आजचा दिवस संपूर्ण भारतात राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून संपूर्ण साजरा केला जातो. २३ ऑगस्ट हा दिवस भारताच्या अंतराळ इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला कारण याच दिवशी भारताने चंद्रावर तिरंगा फडकावला.

या गौरवशाली घटनेची आठवण म्हणून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून घोषित केली. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीयांच्या मनात या दिवसाची स्मृती कायमस्वरूपी कोरली गेली या महान दिवसाला आज दोन वर्ष पूर्ण होत आहे.

२३ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताच्या चांद्रयान ३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग केले आणि इतिहास घडला. चंद्रावर यशस्वीपणे यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा तर दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश बनला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात भारताने चंद्रावर स्वारी केली यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. भारताची ही चांद्र मोहीम चांद्रयान - ३ या नावाने ओळखली जाते.

याआधी भारताने दोनदा चंद्रावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने तो अपयशी ठरला. २००८ साली चांद्रयान १ या मोहिमेस इस्रोने सुरवात केली त्यानंतर २०१९ साली चांद्रयान २ मोहिमेतील यान चंद्राच्या कक्षेत पोहचूनही सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर विसंगतीमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरविण्यास अपयशी ठरले होते. अर्थात चांद्रयान २ पूर्णपणे अपयशी ठरले असेही म्हणता येणार नाही.

कारण चांद्रयान २ मोहिमेवेळी पाठवलेले ऑरबीटर चंद्राच्या कक्षेत यशस्वीपणे कार्यरत होते. या ऑरबीटरवरील काही उपकरणे वापरून चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीचा अभ्यास केला जात होता. तसेच चंद्र व त्याच्या वातावरणाविषयी नवी वैज्ञानिक माहिती अपल्याला मिळत होती.

चांद्रयान ३ हा आधीच्या म्हणजे चांद्रयान २ , मोहिमेचाच भाग होता. या मोहिमेत अपयश आले तेंव्हा यानाचा संपर्क तुटला म्हणून केवल संपर्क तुटा है.... हौसला नहीं! असे म्हणत देशातील १४० कोटी जनता शास्त्रज्ञांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली.

देशातील जनतेला देशातील शास्त्रज्ञांविषयी कमालीचा आदर आणि विश्वास आहे याच विश्वासाच्या बळावर आपल्या शास्त्रज्ञांनी चांद्रयान २ मोहिमेत आलेले अपयश विसरून नव्याने सुरवात केली. चांद्रयान २ मोहिमेच्या अपयशातून धडा घेत चांद्रयान ३ मोहिमेवेळी शास्त्रज्ञांनी पुरेपूर काळजी घेतली होती.

यानातील काही घटक ऐनवेळी कार्यान्वित होऊ शकले नाही तरी यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेल अशी नव्या यानात रचना करण्यात केल्याची माहिती इस्रोचे संचालक एम सोमनाथ यांनी दिली होती.

सेन्सर निकामी होणे, इंजिनमध्ये बिघाड होणे, संगणकातील नियमसंच व गणितीय प्रक्रिया यात होणाऱ्या चुकांची तपासणी करून त्याचे निराकरण करणे यासारख्या बाबींचा विचार करूनच हे यान चंद्रावर झेपावले होते त्यामुळे यावेळी चंद्रयान ३ यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेलच असा विश्वास देशातील १४० कोटी जनतेला होता.

इस्रोच्या शास्त्रज्ञांनी अखेर हा विश्वास सार्थ ठरवला. चांद्रयान ३ मोहीम ही भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. भारताचे हे यान चंद्रावर उतरल्याने चंद्रावर यान उतरवण्यात यशस्वी ठरलेल्या काही मोजक्या देशात भारताचा समावेश झाला.

या मोहिमेद्वारे आपल्या देशातील विकसीत तंत्रज्ञान जगाला दाखवण्याची संधी मिळाली. अंतराळ तंत्रज्ञान व उद्योग यांची सांगड घालून अर्थव्यवस्थेला गती मिळाली. ही मोहीम यशस्वी झाल्याने भविष्यात चंद्रावर मानव पाठवण्याचे स्वप्न साकार होईल. ही मोहीम यशस्वी झाल्याने भारत अंतराळ क्षेत्रात एक महासत्ता म्हणून उदयास आली.

एकूणच भारताच्या अंतराळ क्षेत्रात चांद्रयान ३ मोहीम हा मैलाचा दगड ठरली. आपल्या शास्त्रज्ञांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी रात्रीचा दिवस केला. त्यांच्या या मेहनतीला अखेर यश मिळाले आणि आपली ही चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाली.

चंद्रावर तिरंगा फडककवून भारताने जगाला दाखवून दिले की अंतराळ क्षेत्रात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे. ७८ वर्षांपूर्वी जेंव्हा भारत इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला तेंव्हा भारत सुईचे टोकही बनवू शकणार नाही अशी आपली हेटाळणी केली जायची. जो देश सुईचे टोकही बनवू शकत नव्हता त्या देशाने आज चंद्रावर स्वारी केली आहे हे भारताच्या आजवरच्या सर्व शास्त्रज्ञांचे आणि सरकारचे यश आहे.

या यशाचा देशातील १४० कोटी देशवासीयांना सार्थ अभिमान आहे. चंद्रावर तिरंगा फडकावून अंतराळ क्षेत्रात महासत्ता होण्याच्या दृष्टीने पाऊल टाकणाऱ्या सर्व भारतीयांना राष्ट्रीय अंतराळ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

## बाप्पांचे स्वागत करूयात

**वाचक लिहितात**

लवकरच गणेशोत्सवाच्या निमित्ताने श्री गणेशाचे आगमन होणार आहे. गणपती हे सर्वांचे आराध्य दैवत आहेत. गणपतीच्या आगमनाची लहान-थोर सर्वजण आतुरतेने वाट पाहत असतात. गणेशोत्सवापूर्वी सर्वांची श्री गणेशाच्या स्वागतासाठी लगबग सुरू होते. सजावट कशी करायची? कोणता देखावा उभा करायचा? श्री गणेशाच्या आवडीचे नैवेद्य त्याला दाखवण्यासाठी गृहिणींची पण तयारी सुरु होते. श्री गणेशाचे आगमन होण्यापूर्वी घरातील स्वच्छतेला सुरुवात होते. घराचा कानाकोपरा स्वच्छ करण्यासाठी, जाळी-जळमटे, अडगळ काढण्यासाठी घरातील सर्व मंडळी तत्परतेने पुढाकार घेतात. परंतू श्री गणेशाचे स्वागत करण्याआधी आपण आपले मन शुद्ध, स्वच्छ, निर्मळ आणि पवित्र करायला हवे. कारण श्री गणेशाला असेच मन आवडणार आहे. हे लक्षात घेऊन आपल्या मनाचा कानाकोपरा स्वच्छ करायला हवा. मनामध्ये साठलेली जाळी-जळमटे, दोष-अहं यामुळे आपल्यावर आलेले आवरण हे सर्व साफच करायला हवे. कारण मनामध्ये असलेली ही एक प्रकारची अडगळच आहे आणि हे बाप्पाला आवडणार नाही हे लक्षात घेऊन आधी आपले मन आपण साफ करायला हवे. कारण अशा मनामध्येच श्री गणेशाचा वास असतो. अशाच मनामध्ये त्याला राहायला आवडते. आपल्या हृदयमंदिरामध्ये श्री गणेशाची स्थापना करण्यापूर्वी आधी आपले मन शुद्ध, निर्मळ, पवित्र करूयात.

**■ मनिषा बोराटे, सातारा.**

## केवळ १४ दिवस खा मेथीच्या बिया

भारतीय स्वयंपाक घरात अनेक प्रकारच्या बियांचा वापर मसाला म्हणून केला जातो. यातील अनेक बिया औषधी गुणांनी भरपूर आहेत. त्यापैकी मेथी हे असेच गुणकारी आहे. याचा वापर आयुर्वेदिक मेडिसिन म्हणून केला जातो. आज आपण पाहाणार आहोत की जर तुम्ही सलग १४ दिवस मेथीच्या बियांचे सेवन केले तर तुमच्या शरीरात काय बदल पाहायला मिळतील.

मेथीची बिया आणि त्याची पाने देखील आरोग्यासाठी लाभदायक आहेत. बिया आणि पानांचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक प्रकारचे लाभ मिळतात. आयुवेर्दानुसार मेथीचा स्वाद कडू असतो. मेथी उबदार असल्याने शरीरात उष्णता तयार करते. ज्यांना कफ आणि वात असेल तर नियंत्रित करते. मेथीने पित्त वाढते, त्यामुळे ज्यांना पित्ताचा त्रास आहे त्यांनी याचे सेवन तूपासोबत करावे.

मेथीच्या बियात सॉल्युबल फायबर असते ते तुमच्या ब्लड शुगरला कंट्रोल करते. आणि काबोर्हायड्रेट्सचे अवशोषण प्रक्रीया संथ करते. हे डायबिटीज वा इन्सुलिन रेजिस्टेंन्सवाल्या लोकांना खूपच फायदेशीर आहे. मेथी पचन एंजाईम्सला उत्तेजित करते. त्यामुळे अपचन आणि पोट फुगणे सारख्या समस्या कमी होतात. मेथी कोलेस्ट्रॉलचे शोषण देखील रोखते.,ज्यामुळे हार्ट डिजीसचा खतरा घटतो.

**वजन कमी करण्यास फायदा**

वजन नियंत्रण करण्यासाठी मेथी उपयोगी आहे.



कारण यात फायबर जास्त असते त्यामुळे भूक कमी होते. ब्रेस्टफिड करणाऱ्या मातांसाठी मेथी दूध वाढवण्यास सहायक असते. मेथीची पाने देखील एंटीऑक्सीडेंट्स, विटामिन्स आणि इंफ्लेमेशन कमी करणाऱ्या गुणांनी भरपूर असतात.

**सकाळी रिकाम्या पोटी मेथीचे पाणी**

मेथीच्या सेवनासाठी तुम्ही रात्री एक चमचा बिया पाण्यात भितवत ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी पाणी प्या. तुम्ही बिया देखील चावून खाऊ शकता. पाण्यासोबत बिया गिळूही शकता. चावणे आवडत नसेल त्यांनी गिळाव्यात. या बियांना सलाड , करी वा डाळीत टाकू शकता. जर खुप वेळ भिजवले तर मेथीतून कोंब येतात. ते सलाड किंवा सपूमध्ये टाकू शकता.

मेथीचे दाणे मर्यादित प्रमाणात खावेत. एडल्टसाठी ५ ते २० ग्रॅम पुरेसे आहेत. काही लोकांना पोटात त्रास किंवा अलर्जी असू शकते. डायबिटीजचे औषधे घेणाऱ्यांनी थोडी सावधानता बाळगावी. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### नाही कसं म्हणता?

**अनाठायी योजनांवर
खर्च करता करोडात
आपत्तीत अन्नदाता फसला
हे न समजणे इतपत का
खरच तुम्ही दुधखुळे आहात?**

**योग्य वेळी धाऊन आले
तर मदत लागते सत्कारणी
वराती मागुन घोडे
तुम्हीच सांगा काय कामी ?**

**आत्महत्या केल्यावर द्याल ही
तुम्ही लाखाची मदत, पण
बुंदसे गयी तो
हौदसे नही आती
हे कां तुम्हाला नाही समजत ?**

# रोगराई, महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे. मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.

यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले. येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली. यानंतर १८८४ मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली. आज काळ्या मारबतीला १४५ तर पिवळ्या मारबतीला १४० वर्षे पूर्ण होत आहेत. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ, भ्रष्टाचार दूर व्हावा. नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे १४५ वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पार पाडल्या जाते.

या उत्सवात सर्व धर्माचे लोक आनंदाने सहभागी होतात. त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते. सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात. असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे. त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दिले जाते. मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढून येणाऱ्या विघ्नांच्या विरोधात जय घोष करून ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत.... अशा घोषणा दिल्या जातात.

अमावस्येला घरोघरी मेढ्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते. कालांतराने भ्रष्ट व कलंकित नेता किंवा भ्रष्टाचारी लोकांच्या विरोधात त्याची प्रतिकृती बडगा काढून निषेध केला जातो. महागाई, अत्याचार, आतंकवाद, महामारी, बॅंक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतिकृती काढून निषेध नोंदविला जातो. पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासूनच परंपरा मिळाली आहे . राजकीय पुढारी, अत्याचारी, भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे बडग्याच्या रूपात पहायला मिळते. यामुळे समाजात जनजागृती निर्माण होते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो.

१८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती. त्यानंतर १९२८ मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम दंगली घडविल्या. तरीही मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिला नाही, ही नागपूरसाठी स्वाभिमानाची बाब आहे. करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विघ्न निर्माण झाले. समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.


मारबत उत्सवात बडग्यांची भूमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविणारे असतात. यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळतील . यात महागाई, सिलेंडरची दरवाढ, पेट्रोल दरवाढ, शहरातील खड्डे,



पाकिस्तान, चीन, आतंवाद, घोटाळेबाज, भ्रष्टाचारी, अत्याचारी, बेरोजगारी याविरोधात बडग्यांच्या माध्यमातून लोकांचा आक्रोश दिसून येईल.

मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधून झाली. परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो. आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महागाई, वाढता भ्रष्टाचार यांच्या विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.

देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की इंग्रजांनाही मागे टाकले आहे. देशात महागाई, बेरोजगारी वाढली आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढीस लागल्या आहेत. सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

# गोदरेज ॲग्रोव्हेटतर्फे मका पिकांसाठी आशिताका हे नवीन तणनाशक सादर

**मुंबई/हैदराबाद, २२ ऑगस्ट :** भारतातील अग्रगण्य वैविध्यपूर्ण कृषी-व्यवसायांपैकी एक असलेल्या गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेड (गोदरेज ॲग्रोव्हेट) ने मका पिकांसाठी खास तयार केलेले नवीन तणनाशक सादर केले आहे. आशिताका हा जपानच्या सहकार्याने विकसित केलेला एक अभिनव उपाय असून भारतातील मका शेतकऱ्यांसमोर उभ्या राहणाऱ्या मोठ्या अडचणींपैकी एक असलेल्या गवत व रुंदपर्णी तणांवर प्रभावी नियंत्रण पुरवितो. पिकाच्या प्रारंभीच्या वाढीच्या टप्प्यातील तणांचा प्रादुर्भाव मका उत्पादनावर मोठा परिणाम करतो. २४ तणाच्या पानांच्या अवस्थेत अवलंब केल्यास आशिताका मुळे प्रभावी तण नियंत्रण मिळते.

जागतिक स्तरावर, मका लागवडीच्या क्षेत्रफळात भारत ४ थ्या क्रमांकावर आणि वार्षिक उत्पादनात ५ व्या क्रमांकावर आहे. देशातील वाढती अर्थव्यवस्था आणि मध्यमवर्गाचा विस्तार यामुळे प्राणिजन्य प्रथिनं, स्टार्च व मका वापरणाऱ्या इतर औद्योगिक उत्पादनांची मागणी वाढत आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षात जनावरांच्या खाद्यासाठी, औद्योगिक व जैवइंधन वापरासाठी मक्याची मागणी वाढली आहे. मात्र या क्षेत्राला दर्जेदार बियाणे व कृषी-उपकरणांची मर्यादित उपलब्धता यासारख्या मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. हवामान बदल हे आणखी एक मोठे आव्हान असून अतिवृष्टी, बदलत्या पावसाचे स्वरूप, किडी व रोगांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे मका उत्पादनात अडथळे येऊ शकतात.




त्यामुळे उत्पादनक्षमता वाढविण्यास आणि या पिकाचे महत्त्व टिकवून ठेवण्यास मदत करण्यासाठी आशिताकासारखे संशोधनाधारित उपाय आणणे अत्यावश्यक ठरते.

या सादरीकरणाबद्दल बोलताना गोदरेज ॲग्रोव्हेटच्या क्रॉप प्रोटेक्शन बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजवेलु एन.के म्हणाले, गोदरेज ॲग्रोव्हेटमध्ये भारतीय शेतकऱ्यांना सक्षम करणाऱ्या संशोधनाधारित, नाविन्यपूर्ण उपायसुविधा पुरवणे आणि पर्यावरण व बाजारपेठेतील आव्हानांना तोंड देण्यासाठी शेतकरी कुटुंबांना भविष्याभिमुख करणे हे आमचे ध्येय आहे. मका पिकाच्या वाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यात प्रभावी तण नियंत्रण मिळणे हे उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी महत्त्वाचे आहे. भारतात प्रथमच सादर होणारे आशिताका हे शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्यास व नफ्यात वाढ करण्यासाठी एक प्रभावी साधन ठरेल.

गोदरेज ॲग्रोव्हेटच्या क्रॉप प्रोटेक्शन बिझनेसचे मार्केटिंगचे सरव्यवस्थापक अनिल चौबे म्हणाले, मक्यामधील आशिताकाचे प्रभावी तण नियंत्रण पिक-तण दर कमी करते. त्यामुळे मर्यादित मातीतील ओलावा व पोषणघटकांचा चांगला वापर होतो आणि फुलोरा व दाणे भरण्याच्या टप्प्यात पिकाच्या आरोग्यास मदत मिळते. शिफारस केलेला डोस ५० ml/acre सोबत ४०० ml/acre सफक्टंट असा २४ तण पानांच्या अवस्थेत दिल्यास तणांचे लवकर नियंत्रण होते आणि तणामुळे होणारे उत्पादनातील नुकसानही कमी होते. हवामानाचा फटका बसल्यास हे नुकसान वाढते. यामुळे अधिक सातत्यपूर्ण उत्पादन, चांगल्या प्रतीचे दाणे आणि विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या भागात उत्पन्नातील चढउतारावरील संरक्षण मिळते.

सुरुवातीला तेलंगणा, कर्नाटक आणि तमिळनाडू या प्रमुख मका उत्पादक भागांत सादर केल्यानंतर गोदरेज ॲग्रोव्हेट आशिताका आता लवकरच आगामी महिन्यात सर्व मका पिकविणाऱ्या राज्यांत उपलब्ध करून देण्याची योजना आखत आहे.

# सॅमसंगने भारतात लॉन्च केला गॅलेक्सी टॅब ॲक्टिव्ह५



**मुंबई, २२ ऑगस्ट :** भारतातील सर्वात मोठा कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड सॅमसंगने आज देशात गॅलेक्सी टॅब ॲक्टिव्ह५ एंटरप्राइज एडिशनच्या लॉन्चची घोषणा केली. हा एक मजबूत आणि एंटरप्राइजसाठी तयार केलेला टॅबलेट आहे, जो अतिशय व्यस्त वातावरणात काम करणाऱ्या व्यवसायांना आणि व्यावसायिकांना सक्षम बनवण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये एक्सकव्हर७ रग्ड स्मार्टफोनच्या यशस्वी लॉन्चनंतर, भारतात गॅलेक्सी टॅब ॲक्टिव्ह५ एंटरप्राइज एडिशन आता आणखी चांगल्या परफॉर्मन्ससह उपलब्ध होत आहे. हा टॅबलेट संरक्षण, सार्वजनिक सुरक्षा, लॉजिस्टिक्स, उत्पादन, आरोग्य सेवा, रिटेल आणि सेवा यांसारख्या कठीण व आव्हानात्मक क्षेत्रांच्या गरजा पूर्ण करेल.

गॅलेक्सी टॅब ॲक्टिव्ह५ एंटरप्राइज एडिशन मध्ये १२० रिफ्रेश रेटसह ८.० इंच (२०.३२ सेमी) चे हाय-रेझोल्यूशन डिस्प्ले आहे. हा ऑक्टा-कोर प्रोसेसरवर चालतो, जो सहज मल्टीटास्किंग आणि जास्त कामकाजासाठी योग्य आहे. हा टॅबलेट ६जीबी/१२८जीबी आणि ८जीबी/२५६जीबी अशा दोन मेमरी पर्यायांमध्ये उपलब्ध आहे. डिस्प्लेला बाहेरच्या वातावरणातही स्पष्ट दिसण्यासाठी खास तयार केले आहे, जे भारताच्या विविध हवामान परिस्थितींमध्ये मोठा फायदा ठरते.

सॅमसंग इंडिया चे व्हाईस प्रेसिडेंट, एंटरप्राइज बिझनेस, पुनीत सेठी म्हणाले, सॅमसंगमध्ये आम्ही भारतातील आमच्या प्रवासाला देशाच्या आकांक्षांशी जोडून पाहतो. मेक इन इंडिया आणि डिजिटल इंडियाच्या पुढील टप्प्यापासून प्रेरणा घेऊन आम्ही भारतीय कर्मचाऱ्यांना आजच्या गरजा आणि भविष्यातील संधींसाठी सक्षम बनवण्यास वचनबद्ध आहोत. आमचा प्रत्येक पाऊल भारतात तयार केलेल्या, भारतासाठी खास बनवलेल्या आणि ग्राहकांच्या गरजा व जीवनशैलीनुसार डिझाइन केलेल्या उत्पादनांवर आधारित आहे. हे केवळ उत्पादन नाही, तर भारताच्या भाषेत तंत्रज्ञान आणण्याचे आमचे वचन आहे.

# सर्वसमावेशक विकास उपक्रमाद्वारे आर्थिक वर्ष २५ मध्ये आयसीआयसीआय बँकेने १.८९ कोटी लोकांचे आयुष्य सुखकर केले

***नागपूर, २२ ऑगस्ट :*** *आपल्या वचनाला जागत आयसीआयसीआय बँकेने शाश्वत विकासासाठीची आपली वचनबद्धता अधिक भक्कम करणे सुरूच ठेवले आहे. आर्थिक वर्ष २४-२५ च्या पर्यावरणीय, सामाजिक आणि प्रशासकीय अहवालात याचा उल्लेख करण्यात आला आहे. बँकेने आर्थिक वर्ष २४-२५ या वर्षात आरोग्यसेवा, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरणीय शाश्वतता यासारख्या सामाजिकदृष्ट्या प्रभावी उपक्रमांचा विस्तार केला. आणि याच माध्यमातून त्यांनी १.८९ कोटी लोकांचे आयुष्य सुखकर केले. आर्थिक वर्ष २५ मध्ये बँकेने सीएसआरसाठी ८०१ कोटींची तरतूद केली होती. मागील वर्षीच्या ५१९ कोटींपेक्षा त्यात ५४% ने वाढ झाली आहे. यातूनच दीर्घकालीन सामुदायिक विकासासाठीची तिची वाढती वचनबद्धता अधोरेखित होते.*

*स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करण्यात आले. आर्थिक वर्ष २५ मध्ये, या कार्यक्रमांतर्गत १० लाख महिलांना मदत करण्यात आली, ज्यामुळे सुरुवातीपासूनच लाभार्थ्यांची एकूण संख्या १.१ कोटी झाली आहे. या उपक्रमामुळे महिलांना कर्ज उपलब्ध होणे, आर्थिक साक्षरता वाढण्यास मदत होणे आणि ग्रामीण तसेच निम-शहरी भागात उत्पन्नाच्या दीर्घकालीन संधी निर्माण केल्या आहेत. याव्यतिरिक्त, कौशल्य विकास, शेती आणि सूक्ष्म-उद्योगांसाठी राबवलेल्या उपक्रमांचा ९१ लाखांहून अधिक व्यक्तींना फायदा झाला. ज्यामुळे ग्रामीण उपजीविकेत लक्षणीय सुधारणा झाली.*

*आयसीआयसीआय बँकेने आपल्या आरोग्यसेवेचाही विस्तार केला. ५५० रुग्णालयांसोबत केलेल्या भागीदारीद्वारे बँकेने ४ लाख व्यक्तींना वैद्यकीय उपचारांची सुविधा दिली. ज्यामुळे आरोग्यसेवा लाभार्थ्यांची एकूण संख्या २५ लाखांहून अधिक झाली. दीर्घकालीन आरोग्यसेवा वचनबद्धतेचा भाग म्हणून, बँकेने टाटा मेमोरियल सेंटरला दिलेला आर्थिक निधी १८०० कोटी रुपयांपर्यंत वाढवला, ज्यामुळे संपूर्ण भारतात तीन नवीन कर्करोग रुग्णालये स्थापन करण्यात मदत होईल.*

*पर्यावरण संवर्धन हे आयसीआयसीआय बँकेसाठी एक महत्त्वाची गोष्ट आहे. आर्थिक वर्ष २५ मध्ये, बँकेने ३,३८७ कोटी लिटर पाणी साठवण्याची क्षमता निर्माण केली आणि १७,४५३ पाणवठे पुनर्संचयित केले. याव्यतिरिक्त, ९६९० शाळांमध्ये पावसाचे पाणी साठवण्याची यंत्रणा लागू केली. बँकेने वर्षभरात १२ लाख झाडे लावली, ज्यामुळे आर्थिक वर्ष २०२२ पासून लावलेल्या झाडांची एकूण संख्या ४९ लाख झाली. मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा सारख्या राज्यांमध्ये राबवलेल्या वनसंवर्धन प्रकल्पांद्वारे वनीकरण आणि जैवविविधता संवर्धनात बँकेने सक्रिय योगदान दिले आहे. विशेष म्हणजे, बिहारच्या गया जिल्ह्यात, पारंपरिक - पद्धतीचे पुनरुज्जीवन करण्यात आले. यामुळे ११,९७३ एकरपेक्षा जास्त शेतीला फायदा झाला, तर महाराष्ट्रातील पाणलोट विकास प्रकल्पांमुळे १,२९५ एकर जमीन सुधारण्यास मदत झाली. परिणामी ३७० घरांना भक्कम आधार मिळाला.*

# गौतम अदाणी यांनी आयआयटी खडगपूर मधून भारताच्या 'दुसऱ्या स्वातंत्र्य संग्रामा'चे आवाहन केले

**गोंदिया, २२ ऑगस्ट :** अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी यांनी सोमवारी भारताला दुसऱ्या स्वातंत्र्य संग्रामाची सुरुवात करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की हा संग्राम वसाहतवादी सत्ताधीशांविरुद्ध नसून परकीय तंत्रज्ञान, ऊर्जा आणि डेटा प्रणालींवर अवलंबून राहण्याविरुद्ध असेल. ते आयआयटी खडगपूरच्या हिरक जयंती समारंभात बोलत होते.

गौतम अदाणी म्हणाले की भारताने जरी १९४७ मध्ये राजकीय बेड्या तोडल्या असल्या तरी २०२५ मध्येही आयात केलेल्या सेमीकंडक्टर, ऊर्जा आणि लष्करी प्रणालींवर अवलंबून राहिल्याने देश बाह्य शक्तींसमोर असुरक्षित राहतो. अदाणी यांनी शिक्षक, विद्यार्थी व मान्यवरांनी भरलेल्या सभागृहात म्हटले, आज आपण जी युद्धे लढत आहोत, ती अनेकदा अदृश्य असतात. ही युद्धे सर्व्हर फार्ममध्ये लढली जातात, खंदकांमध्ये नाही. या शस्त्रांचे नाव अल्गोरिदम आहे, बंदुका नाहीत. ही साम्राज्ये जमिनीवर नाही, तर डेटा सेंटरमध्ये निर्माण होतात. आयआयटी विद्यार्थ्यांना भारताचे नवे स्वातंत्र्यसैनिक संबोधून, अदाणी म्हणाले ,त्यांची शस्त्रे म्हणजे कल्पना आणि नवनिर्मिती आहेत. विद्यार्थ्यांना आवाहन करताना ते म्हणाले की तुम्ही राष्ट्रनिर्मितीचा मार्ग निवडावा. ते म्हणाले एक रस्ता




तुम्हाला फक्त पगारापर्यंत घेऊन जातो. दुसरा तुम्हाला वारशापर्यंत पोहोचवतो. पण फक्त एकच रस्ता भारतनिर्मितीच्या गौरवाच्या दिशेने नेतो. त्यांनी १६ व्या वर्षी घर सोडून मुंबईला जाण्याच्या प्रवासापासून ते भारतातील सर्वात मोठा पायाभूत सुविधा समूह उभा करण्याच्या प्रवासाचे उदाहरण दिले.

या प्रसंगी अदाणी यांनी विद्यार्थ्यांशी यशस्वी व्यावसायिक होण्यासाठी काही मंत्र शेअर केले. त्यांनी सांगितले की जो खऱ्या अर्थाने स्वतंत्र विचारांचा आहे, जो जोखीम घेण्यास, जलद निर्णय घेण्यास आणि नुकसान सहज स्वीकारण्यास तयार आहे, तोच खरा चांगला व्यावसायिक होऊ शकतो. त्यांनी पुढे सांगितले की खाजगी क्षेत्रातील कोणतीही कंपनी तेव्हाच प्रगती करू शकते जेव्हा ती दूरदर्शी सरकारच्या धोरणांशी ताल धरून चालते. मागील दशकात सरकारवरील हा विश्वास, भारताच्या क्षमतेवरील श्रद्धा आणि धोरणांवरील माझा विश्वास यांनीच आम्हाला भारतातील सर्वात मोठा पायाभूत सुविधा समूह बनवला आहे.

अदाणी म्हणाले इतके मजबूत व्हा की कोणताही भय आपल्याला जखडू शकणार नाही. इतके उंच उठा की कोणतेही साम्राज्य आपल्याला झुकवू शकणार नाही. इतके बलवान बना की कोणतीही ताकद आपल्याला अडवू शकणार नाही. आपला भारत तुमची वाट पाहत आहे.

# राष्ट्रीय पुरस्कार विजेता दिग्दर्शक राजेश मापुस्करचे सर्जनशील कौशल्य दिसणार सोनी सबवर सुरू झालेल्या इत्ती सी खुशी मालिकेत



**मुंबई, २२ ऑगस्ट :** सोनी सबवर अलीकडेच सुरू झालेल्या इत्ती सी खुशी मालिकेचे हृदयस्पर्शी कथानक आणि सुसंबद्ध व्यक्तिरेखा यांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. सोमवार ते शनिवार रात्री ९ वाजता प्रसारित होत असलेल्या या मालिकेत अन्विता (सुम्बुल तौकीर खान) या तरुणीचा जीवन प्रवास मांडला आहे. जीवनाच्या अत्यंत खडतर अनुभवात देखील छोटे छोटे आनंदाचे क्षण शोधणारी ही तरुणी आहे.

या मालिकेची सर्जनशील बाजू सांभाळत आहेत राष्ट्रीय पुरस्कार विजेता दिग्दर्शक राजेश मापुस्कर. या मालिकेच्या माध्यमातून आपले सिनेमॅटिक कौशल्य आणि भावनांचे गहिरेपण ते टेलिव्हिजनच्या पडद्यावर साकारत आहेत. फरारी की सवारी आणि व्हेंटिलेटर सारख्या चित्रपटांबद्दल ओळखल्या जाणाऱ्या मापुस्कर यांच्या कलाकृतींमध्ये मानवी भावनांचे हृद्य आणि लोभस चित्रण असते. इत्ती सी खुशी मालिकेत त्यांनी जीवनाच्या कडू-गोड वास्तविकता दर्शविणारे कथानक गुंफले आहे. जे प्रेक्षकांना नक्कीच प्रेरक आणि वेधक वाटेल.

मालिकेतील आपल्या योगदानाविषयी बोलताना राजेश मापुस्कर म्हणाले, टेलिव्हिजनकडे घराघरात पोहोचण्याची एक अर्थपूर्ण प्रभाव उत्पन्न करण्याची ताकद असते. जेव्हा सोनी सब आणि रोझ प्रॉडक्शन्स यांनी शेमलेस ची निर्मिती भारतीय प्रेक्षकांसाठी करण्याचे ठरवले, तेव्हा कथानक पुन्हा सांगण्याचे एक आव्हान तर होतेच शिवाय कथानकाचे मर्म कायम राखून ते भारतीय संस्कृतीच्या रंगात सादर करणे देखील गरजेचे होते. एक क्रिएटिव्ह मार्गदर्शक म्हणून माझी भूमिका ही आहे की कथानकातील अस्सलता हरवणार नाही याची दक्षता घेऊन कथानक घडवण्यात टीमचे मार्गदर्शन करणे. आम्ही पटकथा लेखन, व्यक्तिचित्रण आणि कलाकारांची निवड करण्याबाबत खूप काटेकोर राहिलो. आणि प्रत्येक घटकातून भारतीय कुटुंबातील दिसणारा सहजपणा आणि आपुलकी व्यक्त होईल याची काळजी घेतली. साधेपणा हेच इत्ती सी खुशी चे वैशिष्ट्य आहे. ही सामान्य लोकांची आणि त्यांच्यातील अद्भुत लवचिकतेची कहाणी आहे, जी वास्तविक पद्धतीने सांगितली आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना ती नक्की आपलीशी वाटेल. मला आशा आहे की प्रेक्षक स्वतःला या व्यक्तिरेखांमध्ये बघतील आणि इत्ती सी खुशी मधून व्यक्त होणारा प्रामाणिकपणा आणि त्यातील ऊब प्रेक्षकांना जाणवेल.

राजेश मापुस्कर यांचे क्रिएटिव्ह कौशल्य लाभलेली इत्ती सी खुशी ही मालिका प्रेक्षकांना नक्कीच एक आकर्षक आणि भावनिक दृष्ट्या समृद्ध अनुभव देईल.

# आरोग्य विज्ञान विद्यापीठात संगम-२०२५ आंतरराष्ट्रीय परिषदचे २३ ऑगस्ट रोजी उद्घाटन

**नाशिक, २२ ऑगस्ट :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व आय.आय.टी. बॉम्बे यांच्या संयुक्त विद्यमाने संगम-२०२५ आंतरराष्ट्रीय परिषदेचे शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात उद् घाटन समारंभ होणार आहे. विद्यापीठात आयोजित संगम-२०२५ आंतरराष्ट्रीय परिषद हेल्थ इकॉनॉमक्स, टेक्नोलॉजी ॲण्ड जेरिऑस्ट्रीक हेल्थ केअर विषयावर आयोजित करण्यात आली आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभास राज्याच्या माजी मुख्यसचिव श्रीमती सुजाता सौनिक, आय.आय.टी. बॉम्बेचे प्राध्यापक सार्थक गौरव, विद्यापीठाच्या मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) प.वि.से.प., अ.वि.से.प., वि.से.प., मा. प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ व विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.

याबाबत विद्यापीठाच्या मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) यांनी सांगितले की, आरोग्य सेवेतील भविष्यातील तंत्रज्ञान आणि धोरणे या विषयावर कार्यशाळा होणे गरजेचे आहे. या परिषदेत जगभरातील आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी झाले आहेत. ही परिषद केवळ एक व्यासपीठ नसून ते जगभरातील आरोग्य क्षेत्रातील ज्ञानाचा संगम आहे. आरोग्य क्षेत्रात तंत्रज्ञान इतक्या वेगाने विकसित होत आहे की, त्याचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी कसा करावा यासाठी विचार करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुध्दिमत्ता, टेलीमेडिसिन, आणि जेरिऑस्ट्रीक यांसारख्या विषयांवर चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेमुळे आरोग्य सेवेला एक नवी दिशा मिळेल. केवळ उपचारांवर लक्ष केंद्रित न करता, प्रतिबंधात्मक उपायांवरही भर देणे गरजेचे आहे. आरोग्य क्षेत्रातील धोरणात्मक बदलांवर भर देणे गरजेचे आहे. या परिषदेतील चर्चांमधून अनेक धोरणात्मक निर्णय घेतले जावेत, ज्यामुळे आरोग्य सेवा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सहजपणे पोहोचणे शक्य होईल. आरोग्य शिक्षणअधिक प्रभावी करण्यासाठी नवीन धोरणांची गरज आहे यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य वाढविण्यासाठी विविध विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्यात येत आहेत. संगम २०२५ आंतरराष्ट्रीय परिषदेमुळे आरोग्य क्षेत्रातील भविष्यकालीन आव्हाने आणि संधी यावर सविस्तर चर्चा होणार आहे.

संगम-२०२५ आंतरराष्ट्रीय परिषदेत विविध विषयांवरील शोधनिबंधांचे सादरीकरण करण्यात आले. आरोग्य, अर्थशास्त्र, आरोग्य तंत्रज्ञान, वृध्दांचे आरोग्य, सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय उपकरणांमधील नवनवीन शोध या विषयावर संगम-२०२५ आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधांचे सादरीकरण करण्यात आले.

या परिषदेत शोधनिबंध सादरीकरणासाठी हेल्थ केअर टेक्नोलॉजी असेसमेंट ॲण्ड हेल्थ केअर इकोनॉमी, इनोव्हेशन इन पब्लिक हेल्थ ॲण्ड मेडिकल इक्विपमेंट ॲट अफॉर्डेबल कॉस्ट आणि जिरिऑस्ट्रीक ॲण्ड पेरिऑट्रीक हेल्थ केअर ही सादरीकरणाची थीम होती. संगम-२०२५ आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. विठ्ठल धडके, डॉ. वर्षा फडके, डॉ. अमोल पाटील, डॉ. अशोक वानकुंद्रे, डॉ. अविनाश जाधव, डॉ. रुतिका ठाकूर, डॉ. सुप्रिला पालवे, डॉ. प्रज्ञा नागमोडे यांनी परिक्षक म्हणूण उपस्थित होते. या परिषदेत एकूण ४० पेक्षा अधिक संशोधकांनी शोधनिबंध सादर केले.


# आज का अंदाज

शनिवार २३ ऑगस्ट २०२५

**पत्थर फोड एकच**

कल्याण बाजार

१ ४ ७ ८

२९० १४९ २५० २६०
३९० २४८ ३६८ ३५०
४७० ३४७ ४६७ ४४०

१० ४० ७३ ८३
१२ ४२ ७५ ८५
१६ ४६ ७९ ८९

**२३ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

२१ ३१ ६० ९०
२५ ३५ ६४ ९४
२७ ३७ ६८ ९८

१४७ २३८ १५० २३४
३९० ५८० २५९ ४५०
४८० ३०० ३५८ ४६०

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**


# ऑनलाईन अर्ज करताना कागदपत्रांबाबत दक्षता बाळगा : मिलिंद नारिंगे

'महाज्योती'च्या संकेतस्थळावर सूचना फलक (नोटीस बोर्ड) या पर्यायात जाऊन एसएससी-सीजीएल, एमईएस, आयबीपीएस-(पीओ) आणि एलआयसी (एएओ)-२०२५-२६ ला भेट द्यायची आहे. यानंतर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरता येणार. तसेच अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे. सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतरच विद्यार्थ्यांचा अर्ज हा स्वीकृत होणार. तसेच पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची पडताळणी परीक्षा घेऊन प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार, अशी माहिती सुद्धा व्यवस्थापकीय संचालक श्री. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले. इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करतांना आधार कार्ड, जातीचा प्रमाणपत्र, वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, १२ वी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, पदवी उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र, पदव्युत्तर उत्तीर्ण गुणपत्रक किंवा पदव्युत्तरच्या शेवटचा वर्षाचे प्रमाणपत्र आणि दिव्यांग असल्यास ४० टक्के पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला असेही 'महाज्योती' तर्फे कळविण्यात आले आहे. प्रशिक्षणाबाबतचे सर्व तपशील, निकष, अटी व शर्ती तसेच अर्ज करण्याची सविस्तर प्रक्रिया याबाबतची माहिती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदरचे प्रशिक्षण हे नामांकित प्रशिक्षण संस्थांमार्फत देण्यात येणार असून प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड ही प्रवेश परीक्षा घेऊन करण्यात येत आहे. प्राप्त झालेल्या गुणांकाच्या आधारे मेरीटच्या आधारे निकषांनुसार अंतिम निवड करण्यात येणार आहे. महाज्योतीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात येत्या ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरायचा आहे. तसेच अधिक माहितीसाठी ०७१२- २८७०१२०/१२१ या क्रमांकावर संपर्क करावे. या प्रशिक्षणाचा मोठ्या प्रमाणात 'महाज्योती'च्या विद्यार्थ्यांनी घ्यावे असे आवाहनही महाज्योतीचे संचालक मिलिंद नारिंगे यांनी केलेले आहे.

# राशीभविष्य

**मेष :** मन आज थोडे अस्थिर राहू शकते. दिवसाची सुरुवात व्यायाम करून करा, जेणेकरून तुम्ही शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या फिट राहाल. आर्थिक नियोजन करणे महत्त्वाचे आहे, नाहीतर बजेट बिघडू शकते.

**वृषभ :** आज छोट्या गोष्टींना जास्त महत्त्व देऊ नका. आज एखाद्या जवळच्या व्यक्तीसोबत वाद होण्याची शक्यता आहे. हा वाद कोर्ट-कचेरीपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे वाद घालणे टाळा.

**मिथुन :** संवेदनशील स्वभावामुळे तुमच्या जवळच्या मित्राला त्रास होऊ शकतो. कुटुंबाचे तुम्हाला पूर्ण सहकार्य मिळेल. तुमची आर्थिक स्थिती चांगली राहील. तुमच्या व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी तुम्हाला तुमचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल. जोडीदारासोबत चांगला वेळ घालवाल. खर्च वाढण्याची शक्यता आहे. वडिलांचे सहकार्य मिळेल. आरोग्याला जपा.

**सिंह :** आज राग आवरणे गरजेचे आहे. नोकरीमध्ये तुम्हाला प्रगतीची संधी मिळेल. तुमची कमाई वाढेल. पण त्यासोबतच खर्चही जास्त असेल. कुटुंबाचे पूर्ण सहकार्य मिळेल. त्यांच्या आरोग्याची काळजी घ्या.

**कन्या :** मनात आज विचारांचे चढ-उतार सुरू राहतील. तुमचे मन अभ्यासात जास्त रमले जाईल. शैक्षणिक कामांमध्ये तुम्हाला यश मिळेल. समाजात तुमचा मान-सन्मान वाढेल. बौद्धिक कामांमधून उत्पन्न वाढेल.

**तुळ :** आज तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरणात काम करायला मिळेल आणि सहकाऱ्यांशी तुमचे संबंध चांगले राहतील. आज तुम्ही एक नवीन काम सुरू कराल, ज्यामध्ये यश मिळेल.

**वृश्चिक :** स्वभावात बदल जाणवू शकतो, पण दिवसाच्या शेवटी सर्व काही सामान्य होईल. तुमची आर्थिक आणि व्यावसायिक स्थिती चांगली राहील. कुटुंबासोबत प्रवासाचा योग आहे.


**धनु :** आज आत्मविश्वास चांगला राहील, पण पैशांच्या स्थितीवरून तुमच्या मनात काही चढ-उतार असू शकतात. शैक्षणिक कामांमध्ये तुम्हाला नक्कीच यश मिळेल. समाजात तुम्हाला मान-सन्मान मिळेल.

**मकर :** आज तब्येत चांगली राहील. कामाच्या ठिकाणी तुम्हाला एखादे महत्त्वाचे प्रोजेक्ट सोपवले जाऊ शकते. तुमच्या व्यापारिक स्थितीत सुधारणा होईल. यामुळे तुम्हाला अनपेक्षित फायदा होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** नोकरीमध्ये बदल आणि प्रगतीची संधी मिळेल. उत्पन्न वाढेल, पण कामाच्या ठिकाणी बदल होण्याची शक्यता आहे. आजचा दिवस रोमँटिक संबंधांसाठी चांगला नाही. प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**मीन :** कोणताही निर्णय घाईत घेऊ नका. प्रियकर किंवा प्रेयसी तुमच्याकडून काहीतरी खास अपेक्षा ठेवू शकतो, त्यामुळे त्यांना निराश करू नका. तुमच्या जोडीदाराकडून एखादे सरप्राईज गिफ्ट मिळण्याची शक्यता आहे,

# शब्दकोडे क्रमांक २१९९



**आडवे शब्द :-**

१) मोठे भांडण
४) माल साठवून चढ्या भावाने विक्री करणारा
७) विश्वासघातकी
११) भूतकाळ
१३) जंगलातील वाट
१४) अवधान, चित्त
१५) ** तलवार
१६) बांबू
१७) यज्ञ, यज्ञात टाकण्याची आहुति
१८) मनाला टोचणारे दुःख
१९) कोलाहल, मोठा कल्ला
२०) दर्पण
२१) उपकार
२२) घसा
२३) विश्रांती
२५) प्रतिदिनी
२७) घागरा
२९) विणकराचे उपजिविकेचे साधन
३१) कर्ज देणारा
३३) रात्री चमचमणारा किटक
३५) गर्दभ
३७) कृष्णसखी
३८) अमावस्या
४०) द्रव पदार्थ
४१) अंगातील जोम
४२) उगवत्या सूर्याचा देश
४३) पाठविलेला
४५) फक्त, केवळ
४६) शुभ, पवित्र
४८) वाकबगार
४९) स्तुती करणारा
५०) बारावी रास
५१) फळाचे साल
५३) अडकित्याने कातरले जाणारे फळ
५५) पाठीला आलेली वक्रता
५७) एक द्विदल धान्य
५८) कैवारी, रक्षणकर्ता
५९) भीती, जरब
६१) निकट
६४) कणीदार
६६) मीठ
६७) पातक
६८) छंद, मंजुळ आवाज
६९) पत्र
७१) सूर्य रवि
७२) लाकूड कापण्याचे साधन
७४) व्यापारातील फायदा
७५) कानोसा घेण्यासाठी कान ताठ करणे
७६) गोमाता

**उभे शब्द :-**

१) वाळा
२) अरण्य
३) गाणे
४) वर्ष, सन
५) मूर्ख
६) पिता
७) युद्धातील एक प्रेरणादायी घोषणा
८) राण्यांची राहण्याची जागा
९) खूप खाली
१०) रक्षण करणारे सशस्त्र सैनिक
१२) कचेरी
१५) निष्कारण उठाठेव करणारा, फाजील
१६) कलावंत
२०) करवत
२३) अजगर
२४) (स्फोटाचा) मोठा आवाज
२५) रो ह यो चे पूर्ण नाव
२६) कलेवर
२७) पंख
२८) टीमचा प्रमुख खेळाडू, कॅप्टन
३०) घड्याळाचा जागविणारा आवाज
३१) प्रामाणिक
३२) पूर्ण बदल
३४) दुर्गंधयुक्त
३६) मेघ, जलद
३८) राजपुत्र सलीमची प्रेयसी
३९) समाजाला प्रगतीवर नेणारा
४२) दुनिया
४४) वैताग, वायू
४७) लोकरीचा उबदार पट्टा
४९) किमती बहुमोल, अधिक जड
५२) गव्हाचे कणीदार पीठ
५४) गूळ, साखरेचा रस
५५) वसु, पितरांच्या नावाने सोडलेला खोंड
५६) अलमारी
५८) सुकविणे
६०) जपजाप्य
६२) चेहरा, मुख
६३) उंच सखल नसलेले
६५) दिवस
६७) एक चतुर्थांश
७०) सूक्ष्म अंश, अत्यल्प
७३) काढलेली सुट्टी

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मं | गे | श | | ग | त | ध | वा | | ता | ज | म | हा | ल | |
| द | | र | सा | त | ळ | | म | धु | क | र | | ल | वा | द |
| वा | र | पा | र | | वा | स | ना | | द | | चा | चा | | ह |
| स | | त | वा | ना | | वा | व | डी | | दै | | ल | हा | न |
| र | जा | | न | य | न | | ता | र | का | ना | थ | | ल | |
| | गा | ज | | क | स | दा | र | | र | | रा | | सा | रा |
| आ | | म | ज्ञा | व | | ढी | | ज | वा | ह | र | ला | ल | |
| प | ड | दा | | डा | का | | स | न | ई | | क | ल | | न |
| प | | ड | म | | र | म | | न | | भू | | भ | ग | र |
| र | द | | ल | व | ण | शा | क | | सु | | खां | ड | | म |
| भा | र | ती | य | | | ल | ला | ट | रे | षा | | क | म | चा |
| व | | र्था | | वा | स | | कु | | ख | | जा | | हा | रा |
| | को | ट | क | ल्या | ण | | स | म | | ल | गो | ल | ग | |
| आ | स | न | | को | | ब | र | क | त | | जा | डी | | सां |
| वा | रा | | टो | ळी | यु | द्ध | | र | वा | न | गी | | व्या | ज |

# सोन्याच्या बांगड्या चोरणारी 'बुरखाधारी महिला' 48 तासांत जेरबंद

## 5.55 लाखांचा मुद्देमाल जप्त ■ अमरावती पोलिसांची धडक कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 22)** - शहरातील एका ज्वेलरी दुकानात बुरखाधारी दोन महिलांनी तब्बल 5.55 लाख रुपयांच्या सोन्याच्या बांगड्या लंपास केल्याच्या प्रकरणाचा पोलिसांनी केवळ 48 तासांत उलगडा करून दोन्ही महिला आरोपींना मालेगाव (जि. नाशिक) येथून अटक केली आहे. चोरीस गेलेल्या बांगड्या जप्त करण्यात आल्या आहेत.

फिर्यादी चंद्रशेखर बजरंगलाल वर्मा (वय 52, व्यवसाय- ज्वेलर्स, रा. रायली प्लॉट, अमरावती) यांचे 'बजरंगलाल छोटेलाल वर्मा ज्वेलर्स' या दुकानात 18 ऑगस्ट रोजी दुपारी दोन महिला बुरखा घालून आल्या. त्यांनी सोन्याच्या बांगड्या पाहण्याची मागणी केली. दुकानातील महिला कर्मचाऱ्याने बांगड्या दाखवत असताना त्या महिलांनी नजर चुकवून दोन सोन्याच्या बांगड्या (वजन 55.700 ग्रॅम, किंमत 5,55,000/-) चोरून नेल्या. या घटनेनंतर दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता दोन्ही बुरखाधारी महिलांनी संगनमताने चोरी केल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. या घटनेतील महिला आरोपींचे कोणतेही शारीरिक वर्णन वा ओळख नसताना पोलिसांनी दोन स्वतंत्र तपास पथके तयार करून विविध ठिकाणी पाठविली. त्यानंतर पोलिसांनी कसून तपास करून केवळ 48 तासांत दोन्ही आरोपी महिला मालेगाव (जि. नाशिक) येथून ताब्यात घेण्यात आल्या. त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या दोन्ही सोन्याच्या बांगड्या पंचनामा करून जप्त करण्यात आल्या. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त श्याम घुगे व सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलीस निरीक्षक रामदास पालवे, पोलिस उपनिरीक्षक तुषार गावंडे, रंगराव जाधव यांच्यासह पोलीस कर्मचारी हरीष बुंदेले, घनशाम यादव, दीपक श्रीवास, सुकेशनी चक्रनारायण, प्रमोद हरणे, प्रदीप राठोड, अथर अली बेग, मंगेश दिघेकर, आकाश इंगोले, बाबुसिंग राठोड, मोनाली मोकळकर



आदींचा समावेश होता.

# अवैध वाळू-मुरुम वाहतुकीवरून पालकमंत्र्यांवर टीकेची झोड

## प्रशासनाचा दुहेरी चेहरा उघड



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 22)** - अमरावती जिल्ह्यात अवैध वाळू आणि मुरुम वाहतुकीचा प्रश्न चांगलाच गाजत असून, यावरून राजकीय वर्तुळात मोठे वादंग माजले आहे. वरूड, चांदूरबाजार आणि सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणावर मुरुमाचे अवैध खनन व वाहतूक सुरू आहे. या कामामध्ये सत्ताधारी पक्षाशी संबंधित आमदारांचे नातेवाईक थेट गुंतले असल्याचे आरोप सातत्याने होत असल्याने प्रशासन आणि राजकीय वर्तुळ दोन्हीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पालकमंत्री व महसूल मंत्री एका खासगी हॉटेलमध्ये भेटीसाठी गेले होते. या भेटीचा संबंध अवैध मुरुम वाहतूक प्रकरणाशी असल्याची चर्चा रंगताच विरोधकांनी मंत्र्यांवर टीकेची झोड उठवली आहे. संपूर्ण प्रकरणात मंत्री मौन बाळगून आहेत, म्हणजे ते अप्रत्यक्षरीत्या दोषींना पाठीशी घालत आहेत का? असा सवाल विरोधकांकडून केला जात आहे.

राज्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अद्याप या मुद्द्यावर कोणतेही भाष्य केलेले नाही. स्थानिक तसेच राज्यस्तरीय माध्यमांनीसुद्धा या मुद्यावर विशेष लक्ष न दिल्याने हे प्रकरण मुद्दाम दाबले जात आहे का, अशी शंका उपस्थित होत आहे. याशिवाय कारवाई करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर दबाव आणल्याच्या चर्चांनी प्रशासनाचा दुहेरी चेहरा जनतेसमोर उघड केला आहे.

महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमा रेषेतून मोठ्या प्रमाणावर मुरुम आणून तो सरकारी बांधकामांमध्ये वापरला जात आहे. यासाठी कोणतीही अधिकृत परवानगी नसतानाही ठेकेदार आणि स्थानिक नेते मंडळी सर्रासपणे या कामाला प्रोत्साहन देत असल्याचे समोर आले आहे. महसूल मंत्री असूनही त्यांनी या प्रकरणी ठोस भूमिका घेतली नसल्याने जनतेत रोष निर्माण झाला आहे. हॉटेल 365 मधील भेट आणि त्यानंतर सुरू झालेल्या आरोप-प्रत्यारोपाच्या मालिकेमुळे आता मंत्र्यांनी याबाबत पारदर्शक भूमिका घ्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. जनतेच्या मनात प्रशासन, पोलीस आणि राजकीय नेतृत्वाबद्दल अविश्वास वाढत असून, जबाबदारी ढकलण्याच्या प्रवृत्तीवर टीका होत आहे. सोशल मीडियावरून देखील दोषींवर कठोर कारवाई व्हावी अशी जनआक्रोशाची लाट उसळत आहे. सध्या या प्रकरणी जिल्ह्यातील नागरिक आणि विरोधी पक्ष दोन्ही उच्चस्तरीय चौकशीची मागणी करीत आहेत. कारवाईचा बडगा उगारला नाही, तर याचा परिणाम आगामी राजकीय समीकरणांवर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री पुढे काय भूमिका घेतात, याकडे फक्त अमरावती जिल्ह्याचेच नाही, तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# बच्चू कडू यांनी घेतली संत्रा एआय टेक्नॉलॉजीची माहिती



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, (दि. 22)** - 15 आणि 16 ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांना पूरस्थिती निर्माण झाली होती. तरीदेखील प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी खरपी गावाला भेट दिली. त्यांनी संत्रा उत्पादक शेतकरी गौरव बिजवे यांच्या बागेत बसवलेल्या अत्याधुनिक एआय टेक्नॉलॉजीचा प्रत्यक्ष अभ्यास केला.

बिजवे यांनी त्यांच्या संत्रा बागेत आर्द्रता, तापमान, खत व्यवस्थापन आणि कीड नियंत्रणासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित प्रणाली बसवली आहे. या तंत्रज्ञानामुळे कमी खर्चात अधिक उत्पादन घेणे शक्य होते, असे त्यांनी सांगितले. कडू यांनी या तंत्रज्ञानाचा बारकाईने अभ्यास करून, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी सरकारी योजनांमध्ये या तंत्रज्ञानाचा उपयोग होईल यासाठी प्रयत्न करणार आहे, असे आश्वासन दिले. यावेळी कडू यांनी गौरव बिजवे यांचा तसेच करजगाव महसूल मंडळातील मृग बहारात उत्तम कामगिरी करणाऱ्या महिला शेतकरी भारती पोहोरकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. या कार्यक्रमास प्रफुल नवघरे, पुष्पक खापरे, मनोज जैस्वाल, निलेश वाटाणे, निखिल ठाकरे, दीपक भोंगाडे, योगेश भोसले यांच्यासह परिसरातील अनेक संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित होते. कडू यांची ही भेट शेतकऱ्यांमध्ये नवा उत्साह निर्माण करणारी ठरली असून, नव्या तंत्रज्ञानाच्या वापरातून उत्पादनक्षमता वाढवण्याचा आत्मविश्वास शेतकऱ्यांना मिळाला आहे.

# गुरुकुल स्कूल जवळील जमिनीचा वाद चिघळण्याची चिन्हे

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर, (दि. 22)**- गुरुकुल पब्लिक स्कूल लगत असलेल्या मौजे देवमाळी सर्वे नं. 1 मधील जमिनीचा वाद पुन्हा एकदा चिघळला आहे. 20 ऑगस्ट रोजी भूमी उपअधीक्षक गजानन डोईफोडे यांच्या उपस्थितीत झालेल्या मोजणी दरम्यान मूळ जमीनमालक बंटी केजडीवाल आणि गुरुकुल स्कूल अध्यक्ष रवी गोळे यांच्यात वाद पेटला. या वेळी 112 क्रमांकाचा गैरवापर करून पोलिसांना विनाकारण बोलावल्याचा आरोप झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या जमिनीची मोजणी यापूर्वी 2019 तसेच 2024 मध्ये झालेली होती. त्यावेळी केजडीवाल यांनी आक्षेप घेतल्याने मोजणी रद्द झाली होती. मात्र यंदा पुन्हा नोटीस न देता निमतानें मोजणी करण्यात आल्याचा प्लॉटधारकांचा आरोप आहे. प्लॉटधारकांना माहिती मिळताच ते



घटनास्थळी हजर झाले आणि शांततेत सहकार्य केले. तरीदेखील शाळेच्या प्रांगणात 112 क्रमांकावरून पोलीस बोलावून मोजणीवर दबाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचे केजडीवाल यांनी सांगितले. युवा स्वाभिमानचे पदाधिकारी आणि प्लॉटधारक उपस्थित असताना पोलीस केजडीवाल यांना दमदाटी करत असल्याचे आरोप झाले. अखेर मोजणीचे काम शांततेत पूर्ण झाले. मात्र प्लॉटधारकांनी नोटीस न देता मोजणी करण्यात आली असा आक्षेप घेत पंचनाम्यावर अटीसह सही केली. घटनेनंतर केजडीवाल यांनी, गोळे यांनी पोलिसांचा वापर करून आमच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला असा आरोप केला. तर रवी गोळे यांनी, भूखंड विकून शाळेला त्रास दिला जात आहे. माझ्याकडे त्याचे पुरावे आहेत असे प्रतिपादन केले. भूमी उपअधीक्षक डोईफोडे यांनी, पूर्वीच्या आक्षेपांनंतर निमतानें मोजणी करण्यात आली असून यामध्ये कोणाची जागा कोठे आहे हे ठरवले जाणार आहे अशी भूमिका मांडली. या प्रकरणी 112 क्रमांकाचा गैरवापर झाल्याने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे चौकशी व कारवाईची मागणी होत असून, पुढील निर्णयाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सावंगपूर नगरीत श्रावण मास मांड वाढवा सोहळा

## भक्तिरस, चंदनउटी व महाप्रसादाने भक्तिमय वातावरण

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, (दि. 22)** - अवधूत परंपरेचा वारसा जपणाऱ्या श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान, श्री क्षेत्र सावंगा (विठोबा), ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथे यंदाही श्रावण मास निमित्त दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण नगरी भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघणार आहे.

शनिवार, 23 ऑगस्ट रोजी सकाळपासून सार्वजनिक भजन सुरु राहणार आहे. दुपारी 4 वाजता चंदनउटी उत्सव पार पडणार असून, संध्याकाळी 6 वाजता बाहेरगावाहून आलेल्या सर्व भाविकांसाठी महाप्रसाद ठेवण्यात आला आहे. रविवार, 24 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजता अरज व आरतीचे गजरात श्रावण मास मांड वाढवा पार पडणार आहे. दुपारी 12 वाजता गावकरी तसेच सर्व आगंतुक भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

या दोन दिवसांत भजनी मंडळांचे गायन, अखंड हरिनामाचा गजर, चंदनउटी आणि भजनमांड वाढव्याचा भक्तिरस यामुळे सावंगपूर नगरी गूंजून जाणार आहे. भाविकांना आध्यात्मिक उन्नतीचा अनुभव देणारा हा सोहळा दरवर्षी मोठ्या



श्रद्धा व उत्साहात साजरा होतो. सर्व भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या अध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल तसेच विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रवीण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर आणि स्वप्नील चौधरी यांनी केले आहे.



# महावितरण अचलपुर विभागात 79 वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## स्वच्छता व वृक्षारोपण उपक्रमांना उत्तम प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपुर, (दि. 22)** - महावितरण अचलपुर विभागात ७९ वा स्वातंर्त्य दिन राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून १ ते १५ ऑगस्टदरम्यान विविध उपक्रम राबविण्यात आले. माझे कार्यालय स्वच्छ कार्यालय या संकल्पनेनुसार संत गाडगेबाबा स्वच्छता मोहिमेअंतर्गत विभागातील ७ उपविभागीय कार्यालये, ४० वितरण केंद्रे आणि ४२ उपकेंद्रांमध्ये स्वच्छता मोहीम पार पडली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन परिसर स्वच्छतेचे उत्तम उदाहरण घालून दिले.

स्वातंर्त्य दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांच्या हस्ते आंबा, चिंच, जांभूळ, कडुलिंब, बेलफळ आदी वृक्षांची लागवड झाली. महिलांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यालीन परिसरात फुलबाग उभारणीला सुरुवात केली. विशेष म्हणजे, निवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान वृक्षरोपे देऊन करण्यात आला. वृक्षारोपणाचा शुभारंभ त्यांच्याच हस्ते झाला. या मोहिमेत एकूण ७९० वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यकारी अभियंता अंधारे यांच्यासह उपविभागीय अभियंते व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आले. स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजात पोहोचविण्याचा आदर्श अचलपुर महावितरण विभागाने घालून दिल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अंध विद्यार्थ्यांच्या जिद्दीला सलाम

■ जागतिक छायाचित्र दिनानिमित्त रंगल्या क्रिकेट स्पर्धा
■ अंबानगरी फोटो व्हिडिओग्राफर असोसिएशनचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 22)**- जागतिक छायाचित्र दिनानिमित्त 'फोटोग्राफी सप्ताह व आनंदोत्सव 2025'च्या उपक्रमांतर्गत डॉ. नरेंद्र भिवापुरकर अंध विद्यालय, जेलरोड वडाळी येथे अंध विद्यार्थ्यांसाठी विशेष क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सकाळी 8 वाजता सुरू झालेल्या या सामन्यांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साह, जिद्द आणि कौशल्य दाखवत सर्वांचे मन जिंकले. हा क्रीडा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ खेळ नसून आत्मविश्वास वाढवणारा आणि समाजात प्रेरणा देणारा ठरला. खेळादरम्यान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, प्रत्येक फटक्यावर दुमदुमणारे टाळ्यांचे गजर आणि सहकाऱ्यांच्या घोषणांनी विद्यालयाचा परिसर उत्साहाने भरून गेला.

स्पर्धेचे प्रकल्प प्रमुख अनंत जामोदकर होते. त्यांना सह. मयूर कासार, केतन इंगोले, राहुल शर्मा, तनवीर अहमद, सोहेल खान, इमरान शाहा व आकाश दवंडे यांनी परिश्रमपूर्वक साथ दिली. कार्यक्रमाला विद्यालयाचे शिक्षक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित




होते. यात अनिल डहाके, राठोड, चौधरी, वेडेकर, धांडे, सौ. मात्रे, सौ. योगिता राऊत, गाडगे, गवई, नांधे, नाते, सकोलकर व अवसारमोल यांचा समावेश होता. या उपक्रमाचे मार्गदर्शन विद्यालयाचे प्राचार्य नवनाथ इंगोले यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देताना सांगितले की, शारीरिक अडचणी असूनही विद्यार्थ्यांची जिद्द आणि आत्मविश्वास हेच त्यांचे खरे बळ आहे. अशा स्पर्धा त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला नवी दिशा देतात. अंध विद्यार्थ्यांच्या या खेळाडूवृत्तीने उपस्थित सर्वांना भावूक केले. 'फोटोग्राफी सप्ताह व आनंदोत्सव 2025'च्या आयोजनाला या उपक्रमामुळे एक नवा अर्थ प्राप्त झाला. या प्रेरणादायी उपक्रमात अंबानगरी फोटो- व्हिडिओग्राफर्स असोसिएशनचे सक्रिय योगदान राहिले. असोसिएशनचे अध्यक्ष निलश्याम चौधरी, सचिव अक्षय इंगोले, कोषाध्यक्ष निखिल तिवारी, उपाध्यक्ष गजानन अंबाडकर, महेंद्र मोहोड, आकाश लादे, सहसचिव सचिन देशमुख, सहकोषाध्यक्ष संदीप नाईक, सदस्य अनंत जामोदकर, नितेश झा, अजिंक्य सातपुते, सोहेल अहमद, शुभम डोईफोडे, स्वप्नील मनवर, राहुल शर्मा, सागर काजळे, धीरज मानमोडे, रोशन अग्रवाल, हेमंत श्रीवास्तव, तसेच माजी अध्यक्ष अनिल सातपुते, वैभव दलाल, मनीष जगताप, राहुल पवार, दिलीप जीरापुरे, राजेश वाडेकर, जेष्ठ सदस्य जयंत दलाल, विनय तिवारी, नाना चौधरी, महेश सबनीस, प्रमोद जावले, संदीप पाटील, रामेश्वर गुल्हाने, सल्लागार राहुल पालेकर, प्रशांत टाके, नरेश जिरापुरे, अरविंद भूगुल, प्रा. रुपेश फसाटे यांच्यासह असोसिएशनचे अनेक सदस्य उपस्थित होते.

# अतिदुर्गम टेंब्रु शाळेतील विद्यार्थ्यांनी दिला स्वच्छतेचा संदेश

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, (दि.22)** - मेळघाटातील अतिदुर्गम चिखलदरा तालुक्यातील टेंब्रु जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता 1 ते 4 मधील विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा अभियान अंतर्गत विविध आगळेवेगळे उपक्रम राबवून ग्रामवासियांचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांनी टाकावू वस्तू, रंगीत कागद व कलाकुसरीच्या माध्यमातून आकर्षक व देखण्या तिरंगा राख्या बनवून परिसरात राष्ट्रभक्तीचा संदेश दिला. त्याचबरोबर 'हर घर स्वच्छता', 'घर घर स्वच्छता', 'हर घर तिरंगा हर मन तिरंगा' आणि 'स्वातंर्त्याचा उत्सव स्वच्छतेसोबत' अशा आशयाची पोस्टर रंगवून ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.याशिवाय 'एक पेड़ माँ के नामया उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. लहानग्या विद्यार्थ्यांच्या या सृजनशील उपक्रमाचे ग्रामस्थांसह विविध स्तरातून कौतुक होत आहे. मुख्याध्यापक महेश ठाकरे व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे उपक्रम राबविले. यावेळी गटशिक्षणाधिकारी गिरासे व केंद्रप्रमुख शशिकांत डहाके यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व या उपक्रमातून इतर शाळांनी प्रेरणा घ्यावी असे सांगितले.

# वरुड तालुक्यात गटबाजीची ठिणगी

## पक्षात नवे वादळ?

वरुड तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले असून यंदा मतदारांच्या मनासोबतच पक्षांतील अंतर्गत गटबाजी हा निर्णायक मुद्दा ठरण्याची शक्यता आहे.

**नव्या चेहऱ्यांचे आगमन**

विविध राजकीय पक्षांमध्ये नव्या कार्यकर्त्यांचे आगमन सुरू आहे. काही तरुण नेते व बाहेरून आलेल्या लोकांनी थेट मतदारांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे त्यांचा प्रभाव झपाट्याने वाढत असून,

**वार्तापत्र**
**विलास पाटील, वरुड**
**मोबा. 9422155507**



जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या मनात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**जुन्या कार्यकर्त्यांची नाराजी**

गेल्या अनेक वर्षांपासून पक्षासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या तोंडावर दुय्यम स्थान दिले जात असल्याने त्यांच्यात असंतोष वाढला आहे. बाहेरून आलेल्या चेहऱ्यांना अचानक प्राधान्य दिल्याने जुन्या कार्यकर्त्यांची उपेक्षा होत असल्याची चर्चा सुरू आहे. परिणामी, अंतर्गत गट तयार होऊन संघर्ष वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**गटराजकारणाला ऊत**

काही नेतेमंडळी आपल्या गटातील उमेदवारांना संधी मिळावी यासाठी संघटनेच्या निर्णयावर दबाव टाकण्याची शक्यता आहे. त्यामुळे तालुक्यात गटराजकारणाला ऊत येऊ लागला आहे. कार्यकर्त्यांतील मतभेद आणि गटबाजीमुळे पक्षातील एकजूट धोक्यात येत आहे.

### काय म्हणतात जाणकार

राजकीय पंडितांचे म्हणणे आहे की, जर ही गटबाजी कायम राहिली तर काही पक्षांना मोठा पराभव पत्करावा लागू शकतो. त्यामुळे संघटनेतील वरिष्ठ नेत्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून सर्व गटांना एकत्र आणण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. अन्यथा, वरुड तालुक्यातील निवडणूक फक्त मतदारांतील चुरशीची न राहता, पक्षातील अंतर्गत संघर्षाचे रणांगण ठरू शकते.

### मतदारांमध्ये कुतूहल

या अंतर्गत संघर्षामुळे मतदारांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. अखेर या गटबाजीचा निवडणुकीवर काय परिणाम होईल, याबाबत सर्व स्तरावर चर्चा रंगली आहे. मतदारांमध्येही प्रश्न उपस्थित होत आहे की, या संघर्षातून कोणाचा लाभ होणार आणि कोणाचे नुकसान?

# ध्वजारोहणाचा मान गुणवंत विद्यार्थ्यांना

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, (दि. 22)** स्वातंर्त्य दिनानिमित्त जळका (जगताप) येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या हेतूने सलग तीन दिवस गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उच्च श्रेणी मुख्याध्यापक शकील अहमद यांच्या पुढाकारातून या उपक्रमाची अंमलबजावणी झाली.

13 ऑगस्ट रोजी इयत्ता पहिलीतील अद्विका चुनेकर, १४ ऑगस्ट रोजी इयत्ता सातवीतील सर्वेश गजबे तर 15 ऑगस्ट रोजी इयत्ता सहावीतील पूर्वा माने यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या उपक्रमामुळे गुणवत्ता कमावली की सन्मान आपोआप मिळतो हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. शाळेसाठी गाव आणि गावासाठी शाळा या संकल्पनेअंतर्गत निपुण अमरावती, डिजिटल शिक्षण, वाचन उपक्रम, नवोदय व शिष्यवृत्ती वर्ग अशा विविध



उपक्रमांमुळे शाळेची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. यासाठी शिक्षक, पालक, ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य लाभत आहे. या प्रसंगी सरपंच आरती जाधव, माजी सरपंच पंकज जगताप, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी दिशा मिळाली.

# बालांगण

## चिन्ह नव्हे, प्राचीन परंपरा

छोट्या मित्र-मैत्रिणींनो, रुग्णाला तपासल्यावर डॉक्टर एक कागद हातात देतात. त्यामध्ये बरे होण्यास आवश्यक त्या औषधांसंबंधीची माहिती असते. त्यालाच आपण प्रिस्क्रिप्शन म्हणतो. या प्रिस्क्रिप्शनच्या वरच्या




बाजूला तुम्हाला इंग्रजीमध्ये आरएक्स असे लिहिलेले दिसेल. तुम्ही ते पाहिलेही असेल. पण कधी त्याचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे का?

मुलांनो, याची मुळे इतिहास आणि संस्कृतीत रुजलेली आहेत. 'आरएक्स' हे प्रत्यक्षात लॅटिन शब्द Recipere चे संक्षेप रूप आहे. याचा अर्थ 'तू घे' किंवा 'तू ते घे' असा होतो. म्हणजेच हा एक प्रकारचा डॉक्टरांचा आदेशच आहे.

काही विद्वानांच्या मते, याचा उगम प्राचीन इजिप्शियन पौराणिक कथांशी संबंधित आहे. एका आख्यायिकेनुसार, उपचारांचा देव मानल्या जाणाऱ्या होरसने युद्धात डोळा गमावला. तेव्हा देवी इसिसने त्याला बरे केले. त्या पुनर्संचयित डोळ्याला 'होरसचा डोळा' असे म्हटले गेले जे नंतर आरोग्य, संरक्षण आणि उपचारांचे प्रतीक बनले.

होरसच्या या डोळ्याच्या आणि 'आरएक्स' चिन्हाच्या आकारात काहीसे साम्य आहे. म्हणूनच काही अभ्यासकांना या चिन्हाची प्रेरणा प्राचीन चिन्हापासून आली असावी, असे वाटते. आज 'आरएक्स' एक साधे चिन्ह वाटत असले तरी त्यामागील इतिहास जाणून घेता कळते की औषध देणे, उपचार करणे हे नेहमीच एक आध्यात्मिक आणि पवित्र कार्य मानले गेले आहे. अजूनही


**माहिती असावे**

वैद्यकीय तज्ज्ञांकडे जीवन देणारे आणि रोगमुक्त करणारे म्हणूनच पाहिले जाते. तेव्हा 'आरएक्स' हे केवळ कोणते औषध घ्यावे हे लिहिलेल्या यादीवरील चिन्ह नाही तर ते हजारो वर्षांच्या जुन्या उपचार परंपरांचे वाहक देखील आहे, हे तुम्ही समजून घ्यायला हवे.

## गुलाबी शहर जयपूर

मित्रमैत्रिणींनो, जयपूर ही राजस्थानची राजधानी. जयपूरला 'गुलाबी शहर' असं म्हटतात. इथल्या घरांचे, सरकारी इमारतींचे रंग गुलाबी असतात. याच कारणामुळे जयपूर गुलाबी शहर म्हणून ओळखलं जातं. चंढीगड हे नियोजित शहर आहे. याची रचना नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आली आहे. ते देशातलं पहिलं नियोजित शहर असल्याचं म्हटलं जातं. पण प्रत्यक्षात चंढीगडआधीही जयपूरचं नियोजन करण्यात आलं. अवघ्या चार वर्षांमध्ये हे शहर उभारण्यात आलं.

१८७६ मध्ये या शहराला गुलाबी रंगात रंगवण्यात आलं होतं. राजकुमार एडवर्डच्या भेटीसाठी शहराला गुलाबी रंग देण्यात आला होता. तेव्हापासून जयपूर गुलाबी शहर म्हणून ओळखलं जाऊ लागलं. गुलाबी हा रंग स्वागताचं प्रतीक मानलं जातो. म्हणूनच राजकुमाराच्या स्वागतासाठी गुलाबी रंग देण्यात आला होता. जयपूरमध्ये बरेच महाल आणि किल्ले आहेत. जंतर मंतर आणि



**सफर शहरांची**

आमेरचा किल्ला यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आलं आहे. ही दोन्ही ठिकाणं वास्तुकलेची अनोखी उदाहरणं असल्याचं म्हटलं जातं. या शहरातले खाद्यपदार्थ बरेच प्रसिद्ध आहेत. कलाकंद, दालबाटी, चुरमा, घेवर, कांद्याची कचोरी हे पदार्थ इथे खूपच प्रसिद्ध आहेत. या शहराची लोकसंख्या ४० लाखांच्या घरात आहे. ऑक्टोबर ते मार्च या काळात जयपूरला भेट देता येईल.

## चलनावर झळकतो भारताचा अभिमान




छोट्या दोस्तांनो, आपण दररोज अनेक नोटा वापरतो. पण नोटांवर छापलेल्या चित्रांकडे कधी तुमचे लक्ष गेले आहे का? मित्रांनो, चलनावरील ही चित्रं आपल्या इतिहासाचे आणि संस्कृतीचे अभिमानास्पद प्रतीक आहेत.

* दहा रुपयाच्या नोटेवर तुम्हाला कोणार्कचे सूर्य मंदिर दिसते. हे केवळ एक मंदिर नाही तर १३ व्या शतकातील स्थापत्यकलेचे उत्तम उदाहरण आहे. ओडिशाच्या किनाऱ्यावर स्थित हे मंदिर भगवान सूर्याच्या विशाल रथाच्या आकारात बांधले गेले असून त्यामध्ये मोठ्या दगडी चाकांच्या १२ जोड्या आहेत आणि सात घोडे रथ खेचताना दाखवले आहेत. चाकांवर केलेले उत्तम कोरीवकाम अद्भूत आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात समाविष्ट असणारे हे मंदिर भारताच्या समृद्ध कलात्मक वारशाचे उत्तम उदाहरण आहे.

* २० रुपयाच्या नोटेवर तुम्हाला महाराष्ट्रातील एलोरा लेण्याचे चित्र दिसते. एलोरा लेणी ही खडकात कोरलेल्या वास्तुकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या ३४ लेण्या हिंदू, बौद्ध आणि जैन धर्माला समर्पित असून ६०० ईसापूर्व ते १००० ईसापूर्व दरम्यान खडकांमधून त्या कोरलेल्या होत्या. येथील सर्वात प्रसिद्ध रचना 'कैलास मंदिर' ही असून ते एकाच खडकातून कोरलेले जगातील सर्वात मोठे मंदिर आहे.

**वाचा तर खरं**

* ५० रुपयाच्या नोटेवर कर्नाटकातील हंपी रथाचे चित्र आहे. विजयनगर साम्राज्याची वैभवशाली राजधानी असणाऱ्या हंपी येथील अवशेषांमध्ये उभा असलेला हा दगडी रथ प्रत्यक्षात विठ्ठल मंदिराचा एक भाग आहे. हा रथही भारतीय स्थापत्यकलेची भव्यता प्रतिबिंबित करतो.

## क्षेत्र ॲप डेव्हलपमेंटचं




मुलांनो, मोबाईल फोनमध्ये वेगवेगळी ॲप्स असतात. ही ॲप्स कोणी तरी विकसित करत असतं. ॲप विकसित केल्यानंतर त्यांचा वापर सुरू होतो. दररोज नवी ॲप्स दाखल होत असतात. सध्या या क्षेत्रात प्रचंड संधी आहेत. तुम्हीही मोबाईल ॲप्स निर्मितीच्या क्षेत्रात प्रवेश करू शकता. यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

मुलांनो, सध्या वेगवेगळ्या ऑपरेटिंग सिस्टिम्स कार्यरत आहेत. आयओएस, विंडो, अँड्रॉइड, ब्लॅकबेरी अशा ऑपरेटिंग सिस्टिम्सवर काम करणारी ॲप्स असावी लागतात. काही ॲप्स फक्त एकाच ओएसवर काम करतात तर काही ॲप्स कोणत्याही सिस्टिमवर काम करू शकतात. एकाच सिस्टिमवर काम करणाऱ्या ॲप्सना नेटिव्ह ॲप्स तर सर्व ऑपरेटिंग सिस्टिम्सवर काम करणाऱ्या ॲप्सना वेब बेस्ड ॲप्स असं म्हटलं जातं.


ॲप्स डेव्हलपमेंटच्या क्षेत्रात येण्यासाठी आयटी इंजिनिअरींग किंवा एमसीएसारखे अभ्यासक्रम करता येतील. इतकंच नाही, तर कॉम्प्युटरच्या वेगवेगळ्या भाषा भाषाही शिकून घेणं गरजेचं असतं. ॲप डेव्हलपमेंटचे अभ्यासक्रम असतात. यात तुम्ही यूआय डिझायनिंगची प्राथमिक माहिती घेऊ शकता. ठराविक ओएस सिस्टिमसाठी ॲप्स विकसित करायची असतील तर तसे अभ्यासक्रमही आहेत.

**कोण होणार?**

ॲप डेव्हलपमेंटचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर डेव्हलपर कंपनीत काम करता येईल. स्वतःची ॲप्स विकसित करता येतील. ॲप डिझायनिंगसाठी मदत करता येईल. येत्या काळात ॲप्सची संख्या प्रचंड वाढणार आहे. त्यामुळे ॲप डेव्हलपर्ससाठी संधींचा महापूर येणार आहे.



**चित्र रंगवा**



## बर्फाच्छादित शहरं

दोस्तांनो, थंडीत विविध ठिकाणी बर्फ पडू लागतो. भारतातली काही ठिकाणं बर्फ पडल्यामुळे पांढरीशुभ्र झाल्याचं पहायला मिळतं. अशाच काही बर्फाच्छादित शहरांची सैर करू या.

**जाणून घ्या**

⇨ हिमाचल प्रदेशातलं डलहौसी हे अत्यंत सुंदर असं ठिकाण. डिसेंबर-जानेवारी महिन्यात डलहौसीमध्ये बर्फ पडतो. लॉर्ड डलहौसीच्या नावावरून या स्थानाला हे नाव पडलं.

⇨ उत्तराखंडमध्ये औली हे ठिकाण आहे. हे स्थान समुद्रसपाटीपासून १०,५०० फूट उंचीवर आहे. इथल्या बर्फाच्छादित उतारांवरून मस्तपैकी स्कीईंग करता येतं. नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात इथे भरपूर बर्फ पडतो.

⇨ अरूणाचल प्रदेशमधलं तवांग हे असंच एक सुंदर शहर. तवांग प्रांत हे देशाचं एक रत्नच आहे असं म्हणावं लागेल. डिसेंबरमध्ये बर्फ पडल्यानंतर तवांग अजूनच सुंदर दिसू लागतं.

⇨ गंगटोक ही सिक्किमची राजधानी. फेब्रुवारी महिन्यात इथे भरपूर बर्फ पडतो. बर्फ पडत असल्यामुळे पर्यटक मोठ्या संख्येने इथे येतात. या ठिकाणी बुद्ध मंदिरं आहे. गंगटोक हे अत्यंत टुमदार शहर आहे.

⇨ जानेवारी महिन्यात लाचुंगमध्येही भरपूर बर्फ पडतो. हे सिक्किमजवळां शहर आहे. या ठिकाणी आल्यावर लाचुंग मॉनेस्ट्रीला भेट द्यायलाच हवी.

**जिज्ञासा**

### ओळखा पाहू

१) इंडोनेशियाच्या चलनाचे नाव काय?
२) पांढरा कोळसा कशाला म्हणतात?
३) भारतातलं ८० टक्के कोळश्याचं उत्पादन कुठे होतं?
४) अंतरा ही कोणत्या देशाची वृत्तसंस्था आहे?
५) इस्रायलचं चलन कोणतं?
६) व्हिएतनामची राजधानी कोणती?
७) जगातलं सर्वात उष्ण वाळवंट कोणतं?
८) ट्विटर कोणत्या वर्षी सुरू झालं?
९) जगातली सर्वात जुनी वृत्तसंस्था कोणती?
१०) दुसऱ्या महायुद्धाची सुरूवात कधी झाली?

उत्तर : १) रूपियाह २) हायड्रो इलेक्ट्रिसिटी ३) झारिया आणि राणीगंज ४) इंडोनेशिया ५)शेकेल ६) हनोई ७) सहारा वाळवंट ८) २००६ ९) एएफपी १०) १९३९

## गोठलेले प्रदेश

मुलांनो, या जगात थंडगार प्रदेश आहेत. इथे हाड गोठवणारी थंडी पडते. इथलं तापमान खूप कमी असतं. अशाच काही ठिकाणांविषयी...

▸▸ अमेरिकेतल्या मिनेसोटा इथे इंटरनॅशनल फॉल्स आहेत. इथलं तापमान उणे ४८ अंशांपर्यंत खाली जातं. हा धबधबा गोठून जातो. धबधबा गोठल्यानंतर इथे आईसबॉक्स डेज फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. या काळात पर्यटक खूप मजा करतात.

**भ्रमंती जगाची**

▸▸ रशियामध्ये साखा रिपब्लिक नावाचं ठिकाण आहे. इथे फक्त ८०० लोक राहतात. थंडीत इथलं तापमान जवळपास उणे ५२ अंशांपर्यंत पोहोचतं. या दिवसांमध्ये इथल्या शाळाही बंद असतात. एवढ्या कमी तापमानात इथल्या सगळ्या वस्तू गोठतात.

▸▸ जम्मू-काश्मिरमधलं द्रास हे सुद्धा जगातल्या सर्वात थंड ठिकाणांपैकी एक आहे. द्रास म्हणजे नरक. हिवाळ्यात इथे कडाक्याची थंडी असते. याच कारणामुळे या स्थानाला द्रास म्हटलं जातं.

▸▸ नॉर्वेमध्ये हेल नावाचं ठिकाण आहे. इथे १४१८ लोक राहतात. नॉर्वेमध्ये विंटर ऑलिम्पिक्सचं आयोजन केलं जातं. इथेही भरपूर बर्फ पडतो. सगळा परिसर गोठून जातो.

▸▸ कॅनडामध्ये स्नॅग नावाचं ठिकाण आहे. इथे फक्त आठ ते दहा कुटुंबं राहतात. ३ फेब्रुवारी १९४७ या दिवशी स्नॅगमध्ये उणे ८१ अंश सेल्सियस इतक्या तापमानाची नोंद झाली. एवढ्या तापमानात आपली हाडंही गोठून जातील!




**ठिपके जुळवा**



## हिवाळ्यात जपा पेट्सना

हिवाळ्याचे चार महिने आपण कुडकुडत असतो. या दिवसात आपण स्वेटर, गरम कपडे घालतो. गरम पाण्याने आंघोळ करतो. पण मुक्या प्राण्यांचं काय? आपल्या घरातल्या पाळीव प्राण्याची काळजी आपणच घ्यायला हवी. थंडीत प्राण्यांची काळजी कशी घ्यावी याबाबतच्या काही टिप्स...

● सगळ्या प्राण्यांना थंडी वाजते. कुत्रा, मांजर, पक्षी, ससा सगळे प्राणी कुडकुडत असतात. त्यामुळे या दिवसात पाळीव प्राण्याला घराबाहेर ठेऊ नका. खूप थंडी असेल तर त्यांना खोलीतच ठेवा. या प्राण्यांनाही सर्दी होते. थंडीत भटके प्राणी गाड्यांखाली झोपतात. त्यामुळे गाडी काढण्याआधी खाली कोणी झोपलं नाही ना, याची खात्री करून घ्या.

● थंडीत स्वेटर घातल्याशिवाय चैनही पडत नाही. तुमच्याप्रमाणेच तुमच्या प्राण्यांनाही गरम कपडे घाला. त्यांच्यासाठी छानसा स्वेटर शिवून घ्या. पायात मोजे घाला. घरात हिटर असेल तर प्राण्यांनाही ऊब मिळेल असं बघा.

**फन टाईम**

● तुम्ही घरात पक्षी पाळला असेल तर त्यांनाही ऊब मिळू द्या. त्यांच्या पिंजऱ्यावर एखादी चादर टाका. पक्ष्यांना काही काळ शेकोटीजवळ ठेवा.

● कुत्रा, मांजर, ससा या प्राण्यांच्या अंगावर दाट केस असतात. या केसांमुळे या प्राण्यांचा थंडीपासून बचाव होतो. त्यामुळे थंडीच्या दिवसात या प्राण्यांचे केस कापू नका.



**दोस्त हे मस्त**

### कासव कसं राहतं सुरक्षित?

दोस्तांनो, जंगलातले प्राणी थंडीत काय करतात, असा प्रश्न तुम्हाला पडू शकतो. पण या प्राण्यांनाही सुरक्षा कवच दिलेलं असतं. निसर्गानेच त्यांची सोय केलेली असते. आता कासवांचंच बघा. कासव हे शीतरक्तीय प्राणी आहेत. म्हणजे त्यांचं रक्त थंड असतं. या दिवसात कासवं आत लपून बसतात. ऊब मिळवण्यासाठी हे प्राणी एखादी मोक्याची जागा शोधतात.



**खादाडी**

### चॉकलेट, पीनट बटर आणि बनाना बाईट्स


छोट्यांनो, थंडीत तुम्ही चॉकलेट पीनट बटर आणि बनाना बाईट्स हा पदार्थ बनवू शकता. यासाठी एक कप चोको चिप्स घ्या. पाऊण कप पीनट बटर, दोन चमचे खोबरेल तेल, दोन केळी आणि थोडं मीठ घ्या. एका बाऊलमध्ये चॉकलेट चिप्स ठेऊन बाऊल गरम करून घ्या. हे मायक्रोवेव्हमध्ये गरम करायचं आहे. आता पीनट बटर वितळवून घ्या. त्यानंतर चॉकलेटमध्ये खोबरेल तेल घाला. आता बेकिंग कप घ्या. त्यात दोन चमचे चॉकलेट घाला. त्यावर केळ्यांचे तुकडे ठेवा. चमचाभर पीनट बटर घाला. एक चमचा चॉकलेट घाला. त्यावर चिमूटभर मीठ भुरभुरा. आता हा ट्रे दोन तास फ्रीजरमध्ये ठेवा. गार झाल्यावर मस्तपैकी खा.



**स्टडी टिप्स**

### धडा अर्धवट सोडू नका...

मुलांनो, तुम्हाला वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करायचा असतो. प्रत्येक विषयाचा प्रत्येक धडा तुम्हाला समजेलच असं नाही. काही वेळा नीट वाचल्यानंतरही एखादा धडा समजायला थोडा कठीण पडतो. पण धडा कठीण आहे म्हणून तो विषय सोडून देऊ नका. धडा पुन्हा वाचा. धडा वाचताना नीट लक्ष द्या. धड्यातलं नेमकं काय समजलं नाही हे जाणून-समजून घ्या. मगच पुढे जा. न कळणारी बाब दामटवून पुढे जाऊ नका.




**योगा टाईम**

### लाभदायी बद्धकोनासन

दोस्तांनो, बद्धकोनासन किंवा फुलपाखरासारखं आसन केल्यामुळे तुम्हाला बरेच लाभ मिळू शकतात. हे आसन करण्यासाठी पाय पसरून बसा. आता तुमचे दोन्ही पाय दुमडून घ्या. दीर्घ श्वास घ्या. आता दोन्ही पाय फुलपाखराच्या पंखांप्रमाणे वर-खाली करा. यामुळे पाठीचा कणा बळकट होतो तसंच पायाच्या स्नायूंनाही बळकटी मिळते.



# बिबट्याच्या हल्ल्यात तरूण शेतकऱ्याचा मृत्यू





■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :**
कोंढाळी वनपरिक्षेत्रातील शिरमी उपवनातील जाटलापूर चिखली मार्गावर २१ ऑगस्टच्या मध्यरात्री झालेल्या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागपूरचे शेतकरी रमेश मेश्राम यांच्या फार्महाऊससमोर बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शेतकरी चंद्रशेखर व्यंकटराव बल्की (रा. चिखली) हे ठार झाले.

विलास कडवे व चंद्रशेखर बल्की हे रात्री फार्म हाऊससमोर बसले होते. विलास कडवे झोपायला गेल्यानंतर थोड्याच वेळात चंद्रशेखर यांच्यावर बिबट्याने हल्ला केला. रात्री साडे बारा वाजताच्या सुमारास कडवे बाहेर आले असता, बल्की मृतावस्थेत पडलेले दिसून आले. घटनास्थळी बिबट्याच्या पायाचे ठसे आढळले.

पोलीस पाटील कमलेश धोटे, सरपंच राजकुमार चोपडे तसेच गावकरी घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर घटनेची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी पी. एन. नाईक, उपवनपरिक्षेत्र अधिकारी ए. डी. मालके, आर. एन. डाखोळे (क्षेत्र सहाय्यक, चमेली) यांच्यासह कोंढाळी पोलीस ठाणेदार राजकुमार त्रिपाठी व पोलिस स्टाफ घटनास्थळी पोहोचले.

वन व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने पंचनामा करून मृतदेह काटोल ग्रामीण रुग्णालयात पाठविला. घटनेची माहिती मिळताच आमदार चरणसिंग ठाकूर यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत मृतक चंद्रशेखर वेंकटराव बल्की यांचे गाव चिखली गाठले. तेथे बल्की कुटुंबीयांचे सांत्वन केले. तसेच मृतक चंद्रशेखर यांचे वडील व्यंकटराव बल्की यांना वन विभागामार्फत मिळालेला १० लाखाचा धनादेश सुपूर्द केला. तसेच अंत्यसंस्कारासाठी रोख दहा हजार रुपये दिले. बाकीचा १५ लाखांचा धनादेश लवकरच देण्यात येईल, असे वन परिक्षेत्र अधिकारी प्रवीण नाईक यांनी सांगितले.

चंद्रशेखर बल्की हे अल्पभूधारक शेतकरी होते. कंपनी बंद झाल्याने मिळेल ते काम करून संसार सांभाळत होते. त्यांच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गेल्या एका वर्षात कोंढाळी वनपरिक्षेत्रात वाघ-बिबट्यांनी ११० पेक्षा अधिक जनावरे फस्त केली असून आता थेट मनुष्यहानी होत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीती आहे.

# ट्रम्पचा बडग्या, स्मार्ट मीटरवर फोकस!

## नागपूरच्या मारबत उत्सवात दहशतवादी हल्ल्यासह अन्य विषय निशाण्यावर

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :**
ऐतिहासिक वारसा आणि लोकभावनांचा संगम असलेला नागपूरचा मारबत उत्सव यंदा विशेष गाजणार आहे. शनिवार २३ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या या उत्सवात शहरातील विविध मंडळे समाजातील ज्वलंत प्रश्नांवर प्रहार करणारे बडगे उभारत आहेत. यावर्षीचे बडगे दहशतवाद, महागाई, भ्रष्टाचार, स्मार्ट मीटर, व्यसनाधीनता अशा विषयांवर लक्ष केंद्रीत करणार आहे.

अलीकडेच जम्मू आणि काश्मीरमधील पहेलगामजवळ भारतीय पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे दहशतवाद्यांसह अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारतावर लादलेल्या अवास्तव कराच्या धोरणावरही टीका केली जाणार आहे. त्यामुळे यंदा नागपूरकरांची घोषणाबाजी केवळ स्थानिकच नव्हे तर आंतरराष्ट्रीय प्रश्नांनाही स्पर्श करणार आहे.

नागपुरातील नेहरू पुतळा चौक, कोतवाली चौक, गांधी पुतळा चौक, व्हीटी पार्क चौक, अमरावती रोडसह विविध भागांतून बडगे मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. शहरातील विविध मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांच्या मंडळांनी यंदा मारबत महोत्सवात महागाई, वाढते वीजबिल, स्मार्ट मीटरची समस्या, तसेच वाढत्या व्यसनाधीनतेवर जनजागृती करणारे पुतळे उभारले आहेत. यामधून नागरिकांनी प्रशासन आणि सरकारला दिलेला थेट संदेश लक्षवेधी ठरणार आहे.

मारबत हा केवळ धार्मिक सण नसून, तो सामाजिक व्यंग आणि जनजागृतीचा मंच आहे. इडा-पीडा घेऊन जा गे मारबत.. अशा घोषणांमधून लोक आपल्या अडचणी, समस्या आणि त्रास यांचे प्रतीकात्मक उच्चाटन करतात. यंदा विशेषतः महागाईमुळे त्रस्त झालेल्या सर्वसामान्यांचे दुःख, तसेच स्मार्ट मीटरच्या बिलांबद्दलचे असंतोष हे मोठ्या प्रमाणावर व्यक्त होणार आहेत.

मारबत उत्सवाचे वेगळेपण म्हणजे समाजातील चुकीच्या प्रवृत्तींची थेट खिल्ली उडवून नागरिकांना विचार करण्यास प्रवृत्त करणे. यामुळेच प्रत्येक वर्षी नागपूरकरांची आतुरतेने प्रतीक्षा असते.

यंदा ट्रम्पपासून ते व्यसनाधीनतेपर्यंत विविध विषयांवरचे बडगे पाहण्यासाठी नागरिकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. नागपूरचा मारबत उत्सव हा सामाजिक जाणीव, लोकसहभाग आणि व्यंगाचा जिवंत उत्सव असल्याचे यंदाही सिद्ध होणार असून, नागपुरकरांमध्ये कमालीचा उत्साह आहे.







*सर्व छायाचित्र महासागर प्रभाग मित्र भाष्कर पराते यांच्या सौजन्याने.*

# मुख्यमंत्र्यांना दिल्लीत पाठवण्याची तयारी?





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**
भारतीय जनता पक्षाने उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सोपवली आहे. ही निवडणूक आणि मतदान दिल्लीत होणार आहे. मग, भाजप आतापासूनच फडणवीस यांच्यावर जबाबदारी का देत आहे? त्यांना दिल्लीत पाठवण्याची तयारी आहे का? असा खोचक सवाल काँग्रेस नेते व माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. ते पत्रकारांशी बोलत होते.

पटोले म्हणाले, केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर करून कारवाई करायची, लोकांना तुरुंगात टाकायचे, असे मोदी सरकारचे धोरण राहिले आहे. यासंदर्भात अनेक वेळेला न्यायालयाने फटकारले आहे, तरीही एजन्सीचा दुरुपयोग केला जात आहे. आता ३० दिवस तुरुंगात टाकायचे आणि सरकार पाडून टाकायचे, असे यांचे नियोजन असल्याचे पटोले माध्यमांशी बोलताना म्हणाले.

# सहा वर्षीय मुलाचा नाल्यात बुडून मृत्यू
## पोळ्याच्या दिवशी दुर्दैवी घटना



■ **महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. २२ :**
पोळ्याच्या निमित्ताने सुट्ट्या घेऊन शाळेतून घरी आलेला ६ वर्षीय चिमुकला गावालगत असलेल्या नाल्यात वाहून गेल्याचा प्रकार भामरागड तालुक्यात उघडकीस आला आहे. रिशान प्रकाश पुंगाटी (रा. कोयर, ता. भामरागड) असे मृतक मुलाचे नाव आहे.

रिशान प्रकाश पुंगाटी हा कोयर येथील रहिवासी असून तो १० किलोमीटर अंतरावर असलेल्या लाहेरी येथील शासकीय आश्रम शाळेत इयत्ता पहिल्या वर्गात शिक्षण घेत होता. पोळा सण साजरा करण्यासाठी त्याच्या वडिलांनी त्याला गावाकडे आणले होते.

दरम्यान २१ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास तो गावालगत असलेल्या नाल्याजवळ खेळायला गेला होता, अशी माहिती समोर येत आहे. बऱ्याच वेळेपर्यंत घरी न आल्याने गावकऱ्यांनी शोध मोहीम राबवली. मात्र त्याचा शोध लागला नाही. २२ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास महसूल प्रशासनाने गावकऱ्यांच्या मदतीने शोधमोहीम राबवली असता नाल्यात त्याचा मृतदेह आढळून आला.

पोळा सण असल्याने वडील प्रकाश पुंगाटी यांनी शासकीय आश्रमशाळेतून सुट्टी घेऊन रिशानला गावाकडे आणले होते, अशी माहिती सहाय्यक प्रकल्प अधिकारी रोषणा चव्हाण यांनी दिली. मात्र, ऐन पोळ्याच्या दिवशीच काळाने त्याचा घात केला. ६ वर्षीय रिशानचा मृतदेह घेऊन गावकऱ्यांना तुडुंब भरलेल्या नाल्यातून वाट काढावी लागली. नाल्यावर पूल नसल्याने आदिवासींना जीवघेणा प्रवास करावा लागला.

**भामरागड तालुक्यात तिसरी घटना**

१८ ऑगस्टपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे भामरागड तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात नदी नाल्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. सध्या नदी नाले तुडुंब भरून वाहत आहेत.

अशा परिस्थितीत १८ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास भामरागड तालुक्यातील खंडी नाला ओलांडण्याच्या प्रयत्नात लालचंद कपीलसाय लकडा हा १९ वर्षीय तरुण वाहून गेला. त्याच दिवशी सायंकाळी अहेरी तालुक्यातील पल्ले येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक असन्तु सोमा तलांडी हे भामरागड तालुक्यातील जोनावाही आपल्या गावाकडे जाताना सिपनपल्ली नाल्यात वाहून गेले होते. तर दुसऱ्या दिवशी त्यांचा मृतदेह नाल्यात आढळला.

दुसऱ्या घटनेत भटपार येथील टोका डोलू मज्जी या व्यक्तीचा मिरगीचा झटका येऊन नाल्यात बुडून मृत्यू झाला. तो संध्याकाळी एकटाच आंघोळीला गेला होता. दुसऱ्या दिवशी त्याचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. महसूलसेवक सुरेश मज्जी यांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला.

: साप्ताहिक संवाद :

# जीवाष्म इंधनांना पर्याय सॅपचे इंधन



लोकरंग

पेट्रोल, डिझेल, सीएनजी यासारख्या पारंपरिक जीवाश्म इंधनाचा नैसर्गिक साठा हा वर्षानुवर्षाच्या अतिरेकी वापरामुळे आता संपुष्ठात येऊ लागलेला दिसतोय. अर्थात या पारंपरिक इंधनाला पर्याय म्हणूनच विजेवर किंवा सौरऊर्जेवर चालणारी वाहनांची आता निर्मिती होताना दिसतेय. तरी सुद्धा अशा इंधनाला आणखी उपलब्ध पयार्याचा विचार गांभीर्याने करण दृष्टीने प्रत्यक्ष कार्यवाही करण आता काळाची गरज बनली आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने याच अनुषंगाने सॅप हा वापरलेल्या घटकापासून निर्माण केल्या जाणाऱ्या हवाई इंधनाचा पर्याय शोधलेला आहे. हा पर्याय नेमका काय आहे? हे सैफ हवाई इंधन नेमके काय आहे? याच प्रश्नाची उकल करण्यासाठी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे अध्यक्ष अरविंद सहानी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**वापरलेल्या घटकापासून इंडियन ऑइल कॉर्पोरेशन सॅप इंधनाची निर्मिती कशी करणार आहे?**

■ आपण स्वयंपाक केल्यानंतर वाया जाणारे तळणीचे तेल, उसाचे चिपाड, मक्याची सालपट, आदी वापरलेल्या घटकापासून (बिगर पेट्रोलियम फीड्सटॉक) आयओसी शाश्वत इंधनाची निर्मिती करणार आहे.

हे इंधन हवाई इंधन प्रकारचे असून याचा पुरवठा इंडियन ऑइल एअर इंडियाला करणार आहे.यासाठी दोन्ही कंपन्यांमध्ये महत्वाचा करार देखील संपन्न झालेला आहे.

आयओसी यावर्षीच्या डिसेंबर महिन्यापासून आपल्या पानिपत रिफायनरी मध्ये वापरलेल्या स्वयंपाकाच्या तेलापासून सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएलची निर्मिती सुरु करणार असून यासाठी आयटीसी आणि हल्दीराम यासारख्या हॉटेल रेस्टोरा साखळीतून मिळणाऱ्या वापरलेल्या तेलापासून २५ हजार टन ग्रीन इंधन तयार केले जाणार आहे.

**इंडियन ऑइल कॉर्पोरेशन आणि एअर इंडिया या कंपन्यांमध्ये या हवाई इंधनसंदर्भात कोणता करार झालेला आहे?**

■ इंडियन ऑइल कोर्पोरेशन चे अध्यक्ष अरविंद सहानी आणि एअर इंडियाचे सीईओ कंपेबल विल्सन यांच्या उपस्थितीत हा करार संपन्न झालेला आहे.

या करारानुसार विमान वाहतुकीत कमी कार्बन इंधनाचा वापर वाढविणे, जागतिक कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टाना पाठिंबा देणे आणि अधिक टिकाऊ हवाई वाहतूक इंधन कार्यान्वयीत करण्यासाठी संक्रमण करण्यास योगदान देण्याबाबत दोन्ही पक्षांची सामाइक बांधिलकी याबद्दल सामंजस्य करण्यात आले. पानिपत रिफायनरी यामध्ये सॅप उत्पादनासाठी आयएससीसी कोर्सिया प्रमाणपत्र मिळवणारी आयओसी हि पहिली भारतीय कंपनी ठरली आहे.

**सॅप नेमके काय असणार आहे?**

■ सॅप हे बिगर पेट्रोलियम फीड्सटोक पसरून बनवलेले एक पर्यायी हवाई इंधन आहे. हे इंधन हवाई वाहतुकीत कार्बनचे होणारे मोठ्या प्रमाणातील उत्सराज कमी करण्यास महत्वाचे ठरणार आहे.

उपलब्धतेनुसार हे पारंपरिक एव्हिएशन टर्बाईन फ्युएल (ईटीएफ किंवा जेट फ्युएल) मध्ये ५० टक्क्यापर्यंत मिसळता येणार आहे. देशात २०२७ पासून आतंरराष्ट्रीय विमान कंपन्यांना विकल्या जाणाऱ्या जेट फ्युएल यामध्ये १ टक्के सॅप मिश्रण अनिवार्य करण्यात आले आहे. ■ ■

# मुथूट एक्झिमचे छ. संभाजीनगरमध्ये नवे गोल्ड पॉइंट सेंटर



१३८ वर्ष जुन्या व्यवसाय समूह मुथूट पप्पाचन ग्रुपची मौल्यवान धातूची शाखा म्हणजेच मुथूट एक्झिम प्रायव्हेट लिमिटेडने छत्रपती संभाजीनगर मध्ये नवीन गोल्ड पॉइंट सेंटरचे उद्घाटन केले. नवीन मुथूट गोल्ड पॉइंट सेंटर हे दुकान क्र. 3, कुबेर एव्हेन्यू बी, हॉटेल अतिथी समोर, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे मोक्याच्या ठिकाणी आहे. मुथूट एक्झिमचे हे भारतातील ५८ वे गोल्ड पॉइंट सेंटर आहे आणि फिरत्या गाडीसह महाराष्ट्रातील हे सहावे केंद्र आहे.

हे केंद्र स्थानिक लोकांच्या आर्थिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणेल. यामुळे त्यांना त्यांच्या सोन्याच्या वस्तू विकण्याची सुविधा तर मिळेलच, याशिवाय या विश्वासार्ह व पारदर्शक केंद्राद्वारे वित्तीय सेवा अधिक सुलभ होतील. मुथूट एक्झिमचे गोल्ड पॉइंट सेंटर पारदर्शकता, ग्राहकांचा विश्वास जपणे, बांधिलकी आणि त्यांच्या वचनबद्धतेसाठी प्रसिद्ध आहेत.

या केंद्रांवर, ग्राहक त्यांच्या जुन्या आणि वापरलेल्या सोन्याच्या वस्तू वाजवी आणि अचूक मूल्यमापनाच्या आश्वासनासह विकू शकतात. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडली जाते, ज्यामुळे ग्राहकांना प्रत्यक्ष मूल्यांकन पाहता येते. IMPS, NEFT किंवा RTGS सारख्या सुविधांच्या माध्यमातून मोठ्या रकमेचे पेमेंट केले जाते, तर १०००० रुपयांपर्यंतच्या सोन्यासाठी झटपट रोख पेमेंट केले जाते, ज्यामुळे विश्वासार्ह व्यवहाराचा अनुभव मिळतो.

मुथूट एक्झिम प्रायव्हेट लिमिटेड (एमईपीएल) मौल्यवान धातूंच्या बाजारपेठेत नाविन्यपूर्णता आणण्याच्या बाबतीत आघाडीवर आहे. भारतात सोन्याचे पुनर्वापर केंद्र सुरू करणारी पहिली संघटित कंपनी म्हणून, एमईपीएलने उद्योग क्षेत्रात सातत्याने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. ■ ■

# विनोद कांबळी गंभीर
## प्रार्थना करा : भावाची विनंती



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
भारतीय क्रिकेट संघाचा माजी मराठमोळा खेळाडू विनोद कांबळी याची प्रकृती ढासळल्याची माहिती त्याच्या भावाने दिली आहे. विनोद कांबळीला अजूनही स्पष्टपणे चालता बोलता येत नाही. त्याला तुमच्या प्रेमाची व पाठिंब्याची गरज आहे. त्यामुळे त्याच्यासाठी प्रार्थना करा, अशी विनंती त्याने कांबळीच्या चाहत्यांना केली आहे.

वीरेंद्र कांबळी यांनी एका पॉडकास्टला दिलेल्या मुलाखतीत विनोद कांबळीच्या प्रकृतीची माहिती दिली. त्यात त्यांनी कांबळीची प्रकृती फारशी चांगली नसल्याचे स्पष्ट केले. तसेच तो पुन्हा मैदानावर खेळताना दिसेल असा विश्वासही व्यक्त केला.

वीरेंद्र कांबळी म्हणाले, विनोद कांबळी सध्या घरीच आहे. त्याची प्रकृती स्थिर आहे. पण त्याच्यावर अजूनही उपचार सुरू आहेत. त्याला अजून नीट बोलता येत नाही. चालताही येत नाही. त्याला बरे होण्यासाठी वेळ लागेल. पण तो एक चॅम्पियन आहे. तो पुनरागमन करेल. कदाचित तो पुन्हा मैदानात खेळतानाही दिसेल. त्यामुळे मी त्याच्या चाहत्यांना केवळ एवढेच सांगू इच्छितो की, तो बरा व्हावा यासाठी प्रार्थना करा. त्याला तुमच्या पाठिंब्याची गरज आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे विनोद कांबळीला यापूर्वी यूरिन इन्फेक्शन झाले होते. त्यानंतर ते बरे झाले होते. पण गरत डिसेंबरमध्ये ही समस्या पुन्हा वाढली होती. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली होती. तपासणीत त्यांच्या मेंदूत गाठ असल्याचे निष्पन्न झाले होते. तेव्हापासून त्याच्यावर सलग उपचार सुरू आहेत.

विनोद कांबळीची प्रकृती गंभीर आहे. कारण, त्याला एकाचवेळी एकाहून अएधिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लघवीचा संसर्ग, पेटके व मेंदूतील गाठ यामुळे त्याची मज्जासंस्था व मूत्रपिंड कमकुवत होत आहे. अशक्तपणा व थकवा यामुळे त्याच्या प्रकृतीवर विपरित परिणाम होत आहे.


# तेजस्वी यादव विरोधात गडचिरोलीत गुन्हा

■ **महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. २२ :**
बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तथा आरजेडीचे नेते तेजस्वी यादव यांच्याविरोधात गडचिरोली पोलिसात तक्रार करण्यात आली आहे. भाजपचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी ही तक्रार केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी ह्यएक्सह्नवर आक्षेपार्ह टीका करून सामाजात तेढ निर्माण करण्याचा यादव यांनी प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

यादव यांनी पंतप्रधानांविषयी अपमानास्पद वक्तव्य केले आहे. यामुळे देशातील नागरिकांमध्ये अस्वस्थता, संभ्रम आणि संताप पसरू शकतो, असे डॉ. नरोटे यांनी तक्रारीत नमूद केले.

त्यांनी संबंधित पोस्टची लिंक तसेच स्क्रीनशॉटही पोलिसांना सादर केले. काही समाजविरोधी प्रवृत्तीकडून राजकीय हेतू साद्य करण्यासाठी देशातील सामाजिक सौहार्द, शांतता व सुरक्षिततेला बाधा आणण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. अशा वक्तव्यांमुळे देशाची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर डागळली जात आहे. हे ट्विट केवळ राजकीय टीका नसून, पंतप्रधानांच्या आडून थेट देशालाच लक्ष्य केले जात आहे. विशेषतः गडचिरोलीसारख्या संवेदनशील भागात अशा प्रकारचे प्रचार हे शांततेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकतात, असे सांगत त्यांनी तक्रार केली आहे.

# हिरवंगार गुवाहाटी




आसामच्या राजधानीचं शहर म्हणजे गुवाहाटी. ब्रम्हपुत्रा नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या या शहराकडे पर्यटक आकर्षित होतात. घाटातून होणारी बसवाहतूक, रमणीय हिरवागार डोंगराळ परिसर, शेती व बागायती परिसर यामुळे हिवाळ्यात जाण्यासाठी हा एक वेगळा पर्याय तुमच्यासमोर असेल. भारताच्या ईशान्येकडील अति रमणीय, नैसर्गिकदृष्ट्या नटलेला आसाम पर्यटकांसाठी चांगलं आकर्षण आहे.

आसाम म्हणजे म्यानमार, तिबेट (चीन) भूतान, पू. बंगाल (बांगलादेश) ह्या आंतरराष्ट्रीय सीमांना भिडलेला भाग आहे.

ह्या भागांतून तिस्ता, हुगळी, गंगा, ब्रह्मपुत्रा ह्या नद्या जातात. साहजिकच हा परिसर शेतीनं संपन्न आहे. इंडस्ट्री म्हणावी तशी नसल्यानं शांत, प्रदूषणमुक्त परिसरातून प्रवास होतो. गुवाहाटीजवळ एक मोठा प्रसिद्ध तलावही आहे, जिथे विविध प्रकारचे पक्षी पाहायला मिळतात.

गुवाहाटी रेल्वेस्थानक प्रशस्त असून आसपास पर्यटकांसाठी भरपूर हॉटेल्स आहेत. तेथून जवळच म्हणजे सुमारे तीन किमीवर लांब व रुंद पात्र असलेली ब्रह्मपुत्रा दिसते.

छोट्या बोटीने नदी काठ पार करावा लागतो. बोटीतून ब्रह्मपुत्रा पार करणं म्हणजे पर्यटकांसाठी पर्वणीच असते. ब्रह्मपुत्रा जिथे उगम पावते तेथे बेट असून काही (५० ते ६०) पायऱ्या वर चालल्यावर उमानंद महादेव शिवमंदिर आहे.

पुढे नवग्रह, वशिष्ठ मंदिर २० किमीवर असून गुवाहाटी रेल्वेस्टेशनहून सुमारे ३० किमीवर सफेद मार्बलचं बालाजी मंदिर आहे. कलाक्षेत्र या सांस्कृतिक संग्रहालयात आसामची सांस्कृतिक झलक पाहायला मिळते. गुवाहाटीपासून ६० किमी हाजो इथे विष्णू महादेव मंदिर असून ते चढावावर आहे. मंदिराला आसामचं खजुराहो म्हणतात. गुवाहाटीपासून जेमतेम ४० किमीवर सौलकुची नावाचं महिला पर्यटकांना आकर्षित करणारं ठिकाण आहे. एकूणच आसाम झक्कास. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# पृथ्वीराज चव्हाणांच्या कुटंबीयांचे ३ ठिकाणी मतदान

भाजपचा गंभीर आरोप



■ **वृत्तसंस्था, सांगली, दि. २२ :**
काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कुटुंबीयांचे 3 ठिकाणी मतदान असल्याचा गंभीर आरोप भाजपच्या एका पदाधिका-याने केला आहे. कथित व्होट चोरीच्या मुद्यावरून काँग्रेसने देशभरात भाजप विरोधात रान पेटवले असताना पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर हा आरोप झाला आहे. त्यामुळे या प्रकरणी मोठे राजकारण होण्याची शक्यता आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतचोरीच्या मुद्यावरून केंद्रातील सत्ताधारी भाजपला कोंडीत पकडले आहे. या प्रकरणी त्यांनी निवडणूक आयोग व मोदी सरकारवर संगनमत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्याचे तीव्र पडसाद देशभरात उमटत असताना भाजप आमदार अतुल भोसले यांच्या समर्थकांनी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कुटुंबातील सदस्यांचे एकाहून अधिक ठिकाणी मतदान असल्याचा आरोप केला आहे.

वृत्तानुसार, पृथ्वीराज चव्हाण यांचे पुतणे इंद्रजीत चव्हाण यांचे ३ ठिकाणी मतदान आहे. एवढेच नाही तर इंद्रजीत चव्हाण यांच्या पत्नी, आई व मुलगा यांचेही मतदार यादीत ३ वेळा नाव आहे. पृथ्वीराज चव्हाण यांचे अन्य एक पुतणे राहुल यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांचेही ३ ठिकाणी मतदान आहे. विशेष म्हणजे या सर्वांनी वय बदलून नाव नोंदणी केली आहे.

पृथ्वीराज चव्हाण हे काँग्रेसच्या बोगस मतदान संशोधन समितीचे अध्यक्ष आहेत. पण त्यांच्याच मतदारसंघात अशा प्रकारे घोळ करणे नैतिकतेला धरून नाही. चव्हाण कुटुंबीयांनी दक्षिण कराड विधानसभा मतदारसंघात दुबार, तिबार मतदान नोंदणी करून २०१४ व २०१९ च्या निवडणुकीत यश मिळवले. या प्रकाराला पृथ्वीराज चव्हाण यांची संमती होती का? असा सवाल भाजप आमदार अतुल भोसले यांचे समर्थक कराड दक्षिण तालुकाध्यक्ष धनंजय पाटील यांनी केला आहे.

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात पृथ्वीराज चव्हाण यांनी व्होट चोरी केली आहे. कराडच्या पाटण कॉलनीतील घरात १५ नावे आहेत. त्यातील अनेकजण त्या घरात राहत नाहीत. चव्हाण यांच्या घरातील ९ लोकांची नावे दुबार आहेत. यात पृथ्वीराज चव्हाण यांच्या भाऊ, पुतणे, वहिनी यांच्यासह इतर कुटुंबीयांचा समावेश आहे, असेही ते या प्रकरणी म्हणालेत.